खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरु महाविद्यालय

ता. खेड (राजगुरुनगर), जि. पुणे

# भूगोल विभाग

# शैक्षणिक सहल वृत्तांत

(वाई – पाचगणी – मॅप्रो – भिलार – मांघर – महाबळेश्वर – प्रतापगड)

## द्वितीय वर्ष कला (भूगोल विभाग)

मार्गदर्शक

प्रा. डॉ. दिलीप मुळूक

प्रा. डॉ. दादासाहेब मारकड

प्रा. मच्छिंद्र मुळूक

भूगोल विभाग

सन २०२४ – २०२५

खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरु महाविद्यालय

**ता. खेड (राजगुरुनगर), जि. पुणे**

## भूगोल विभाग

**सन २०२४ – २०२५**

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की कु./कुमारी————————————————————— रोल नंबर ———————— परिक्षा क्रमांक ————————— हयाने /हिने एस. वाय. बी. ए. मध्ये सन २०२४ – २०२५ या शैक्षणिक वर्षात भूगोल या विषया अंतर्गत पाचगणी महाबळेश्वर प्रतापगड या शैक्षणिक सहलीमध्ये सहभागी होऊन सहल वृत्तांताचे प्रात्यक्षिक काम समाधानपुर्वक पुर्ण केले आहे.

**प्रा. डॉ. दादासाहेब मारकड**
**सहल समन्वयक**

**प्रा. दिलीप मुळूक**
**(भूगोल विभाग प्रमुख)**

खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरु महाविद्यालय

**ता. खेड (राजगुरुनगर), जि. पुणे**

## भूगोल विभाग

**सन २०२४ – २०२५**

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की कु./कुमारी————————————————————— रोल नंबर ————————— परिक्षा क्रमांक —————————— हयाने /हिने टी. वाय. बी. ए. मध्ये सन २०२४ – २०२५ या शैक्षणिक वर्षात भूगोल या विषया अंतर्गत पाचगणी महाबळेश्वर प्रतापगड या शैक्षणिक सहलीमध्ये सहभागी होऊन सहल वृत्तांताचे प्रात्यक्षिक काम समाधानपुर्वक पुर्ण केले आहे.

**प्रा. मच्छिंद्र मुळूक**
**सहल समन्वयक**

**प्रा. डॉ. दिलीप मुळूक**
**(भूगोल विभाग प्रमुख)**

# ऋणनिर्देश

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या कलाशाखे अंतर्गत विशेष स्तरावर भूगोल या विषया अंतर्गत कोल्हापूर कोकण दर्शन सहल वृत्तांत तयार करणे अनिवार्य आहे.

शैक्षणिक वर्ष भूगोल या विभागातील सन २०२४ – ५५ या कालावधीत भूगोल विषयावर वृत्तांत तयार करणे यामध्ये शैक्षणिक सहल हा विषय निवडला असून, **वाई – पाचगणी – मॅप्रो – भिलार – मांघर – महाबळेश्वर – प्रतापगड** या ठिकाणी जावून भेट दिली. यावरून निरिक्षण करून हा सहल वृत्तांत तयार केला आहे.

प्राचार्य. डॉ. शिरीष पिंगळे सर, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे व भूगोल विभाग प्रमुख प्रा. डॉ. दिलीप मुळुक यांनी आम्हाला सहलीस जाण्यास परवानगी दिली. तसेच आम्हाला सहलीस जाण्यास प्रोत्साहित केले त्याबद्दल आम्ही सर्व त्यांचे आभारी आहोत. हा सहल वृत्तांत तयार करण्यासाठी प्रा. डॉ. मारकड डी. एम., प्रा. एम. एल. मुळुक सर यांनी आम्हाला मार्गदर्शन केले. त्याबद्दल आम्ही सर्व त्यांचे आभारी आहोत.

तसेच हा सहल वृत्तांत तयार करण्यासाठी ग्रंथालय प्रमुख प्रा. पूनम तापकीर व त्यांचे सहकारी यांनी वृत्तांता संदर्भातील पुस्तके उपलब्ध करून दिली त्याबद्दल आम्ही सर्व त्यांचे आभारी आहोत.

त्याचप्रमाणे माझ्या सर्व मित्र आणि मैत्रिणींनीचे मोलाचे सहकार्य केले त्याबद्दल मी सर्वांचा आभारी आहे.

भूगोल विभागाचे शतशः आम्ही सर्वजण आभारी आहोत.....

सही ——————————————

विद्यार्थ्यांचे नाव——————————————

# अनुक्रमणिका


प्रमाणपत्र

ऋणनिर्देश

अनुक्रमणिका १–२

फोटोंची व नकाशांची यादी ३

**प्रकरण १ ले**

**प्रस्तावना** ४–८

१.१ प्रस्तावना

१.२ शैक्षणिक सहलमार्ग

१.३ शैक्षणिक सहल मार्ग नकाशा

१.४ शैक्षणिक सहलीची उद्दिष्टये

**प्रकरण २ रे**

**भौगोलिक माहिती** ९–१७

१. भुपृष्ठरचना

१.१ पर्वत

१.२ पठारे

१.३ मैदाने

२. हवामान हवामानाची वैशिष्टये

३. तपमान

४. पर्जन्य

५. मृदा प्रकार व मृदेची वैशिष्टये

६. वनस्पती व जंगलांची वैशिष्टये

**प्रकरण ३ रे**

**आर्थिक घटक** १८–२७

❖ प्राथमिक श्रेणीचे व्यवसाय

१. शेती

२. वनसंकलन

३. पशुपालन

❖ द्वितीयक श्रेणीचे व्यवसाय

१) कारखानदारी

२) फळ प्रक्रिया उदयोग

३) हस्तकला उदयोग

४) वनोत्पादने

❖ तृतीयक श्रेणीचे व्यवसाय

१) वाहतुक

२) पर्यटन

**प्रकरण ४ थे**

**पर्यटन विषयक घटक** २८—४०

**१. महाबळेश्वर**

**२. पांचगणी**

**३ वाई**

**४. भिलार — पुस्तकांचे गाव**

**५. मांघर — मधाचे गाव**

**प्रकरण ५ थे**

**समारोप** ४१—४५

**सहली दरम्यानचे काही जिओटॅग छायाचित्रे** ४६—४८

**संदर्भ ग्रंथ सुची** ४८

## ❖ नकाशांची यादी



| अ.नं. | नकाशाचे नाव | पान नं. |
|---|---|---|
| १ | शैक्षणिक सहल मार्गाचा नकाशा | ६ |
| २ | पर्यटन स्थळांचा नकाशा | ७ |



## ❖ फोटोंची यादी



| अ.नं. | फोटोचे नाव | पान नं. |
|---|---|---|
| १. | महाबळेश्वर परीसरातील वनस्पती डोंगरकडे पावसाळयातील दृश्य | १७ |
| २. | सह्याद्रीतील वनस्पती | १७ |
| ३. | महाबळेश्वर येथील स्ट्रॉबेरी शेती | १९ |
| ४. | महाबळेश्वर बाजारपेठेतील लाकडी खेळणी आणि वस्तूंचे दुकान | २२ |
| ५. | महाबळेश्वर — सहयाद्री पर्वतातील डोंगरकडे | २७ |
| ६. | महाबळेश्वर — माल्कम बाजारपेठ | २७ |
| ७. | महाबळेश्वर वेण्णा सरोवरात विद्यार्थी जलविहार करताना | २८ |
| ८. | महाबळेश्वर डोंगररांगा | ३२ |
| ९. | पाचगणी महाबळेश्वर — मॅप्रो गार्डन | ३४ |
| १०. | वाई — गणेश मंदीर व कृष्णाकाठ | ३६ |
| ११. | पुंस्तकांचे गाव — भिलार | ३८ |
| १२. | मधाचे गाव मांघर — सातारा | ४० |
| १३ | सहली दरम्यानची काही जीओटॅग छायाचित्रे | ४६—४८ |

# प्रकरण १ ले

# प्रस्तावना

## प्रास्ताविक

प्राचीन काळापासून भ्रमंती करणे, विविध ठिकाणे निसर्गनिर्मीत ठिकाणे पाहणे व त्यापासून मिळणारा आनंद घेणे ही माणसाची मानसिकता आहे. जशी माणसाची उत्क्रांती व प्रगती शारिरिकदृष्टया असो किंवा बौध्दीकदृष्टया असो मानवाची प्रगती होत गेली त्यामुळे माणसाला निसर्गातील सुंदर व लोभानिय गोष्टी ठिकाणे पाहण्यासाठी फिरायची आवड निर्माण झाली यालाच आपण सहल म्हणतो.

सन २०२४—२०२५ या शैक्षणिक वर्षात भूगोल विभागाची शैक्षणिक सहलीसाठी महाराष्ट्रातीले महाबळेश्वर भागातील पर्यटन स्थळे निवडली कारण निसर्गरम्य ठिकाणे आकर्षक डोंगरदऱ्या धार्मिक स्थळे ही भौगलिकदृष्टया महत्वाची आहे. पर्यटन केल्याने माणसात एकांत व मानसिक शांतता मिळते. स्वताचा विकास होण्यास मदत होते.

या शैक्षणिक सहलीस २० फेब्रुवारी २०२५ रोजी पहाटे ०४.०० वा. राजगुरूनगर येथून ३८ विद्यार्थ्यांसह सहलीस सुरूवात झाली. पुणे सातारा मार्गे वाई हे पहिले ठिकाण सकाळच्या वेळी पाहिले. तेथे आम्ही कृष्णा नदीच्या तीरावर गणेश मंदीर पाहिले. तसेच कृष्णा नदीचे पहिल्या टप्प्यातून दुसऱ्या टप्प्यात आल्यानंतर निर्माण झालेले निसर्गनिर्मित भूरूपे पाहिली. त्यानंतर पाचगणी या ठिकाणी पाचगणी पठार पाहिले. पाचगणी कडे जात असताना घाट रस्त्याने वर चढून जात असताना अतिशय विलोभनीय भौगोलिक भूदृश्य पहावयास मिळत होती. पाचगणी परीसरातील मॅप्रो गार्डन म्हणजेच मॅप्रो कंपनीच्या खादय उद्योगाला आणि तेथे असणाऱ्या स्ट्रॉबेरीच्या शेतांना भेट दिली. आणि कंपनी विविध प्रकारचे जे उत्पादन घेते याची माहिती जाणून घेतली. प्रत्यक्ष शेतामध्ये जाऊन स्ट्रॉबेरी या पिकाची सविस्त माहिती जाणून घेतली. त्यानंतर भिलार या पुस्तकाच्या गावाला भेट देवून पुढे महाबळेश्वर परीसरातील मधाचे गाव मांघर या ठिकाणी भेट दिली. त्यानंतर महाबळेश्वर आणि परीसरातील पर्यटन स्थळे पाहून पुढे प्रतापगड या ठिकाणी गेलो.

या संपूर्ण एक दिवसीय प्रवासामध्ये अनेक बाबी आम्ही प्रत्यक्ष पाहिल्या त्याचा आस्वाद घेतला. भौगोलिक दृष्टीकोनातून प्रत्येक बाबींकडे आम्ही पाहत होतो. सहयाद्रीच्या कुशीत वसलेल्या महाबळेश्वर, पाचगणी आणि प्रतापगड ही पर्यटन स्थळे पुणे आणि मुंबई या शहरांपासून जवळ असल्याने हजारोंच्या संख्येने दररोज या ठिकाणी पर्यटक भेटी देत असतात, याची अनुभूती प्रत्यक्षात आम्हाला आली.

## शैक्षणिक सहलमार्ग

राजगुरूनगर

▼

वाई

▼

पचगणी

▼

मॅप्रो गार्डन

▼

भिलार

▼

मांघर

▼

महाबळेश्वर

▼

प्रतापगड


▼

वेण्णा लेक


▼

राजगुरूनगर

# शैक्षणिक सहल मार्ग नकाशा – १



# प्रत्यक्ष पर्यटन स्थळांचा नकाशा – २




वरील नकाशामध्ये सातारा जिल्हयातील वाई ते प्रतापगड या दरम्यान आम्ही सहलीच्या दरम्यान भेट दिलेल्या ठिकाणांचा नकाशा दर्शविण्यात आला आहे. हा नकाशा गुगल मॅपवरून घेण्यात आला आहे. या सहलीच्या दरम्यान असलेली सर्व पर्यटन स्थळे सहयाद्रीच्या डोंगरांगामध्ये वसलेली आहेत. कोकणातील पोलादपुर ते दख्खनच्या पठारावरील वाई या दरम्यान सुमारे ७० किमी रूंदी असलेला सहयाद्री या प्रदेशात आहे. आणि सहली दरम्यान पाहिलेली सर्व ठिकाणे याच पट्टयात विखुरलेली आहेत.

## शैक्षणिक सहलीची उद्दिष्टये—

सहलीला जाण्याचा मुख्य उद्देश म्हणजे सहल या माध्यमातून भूगोल या विषयाचा शैक्षणिक अभ्यास करणे त्याचप्रमाणे एखादे ठिकाण पाहणे तेथील संस्कृती परंपरा, धार्मिक स्थळे निसर्गानिर्मित ठिकाणे यांचा अनुभव घेणे व शैक्षणिक अभ्यास करणे आणि याबरोबर त्यातून मिळणारा सहलीचा आनंद लुटणे असे अनेक उद्देश सहलीस जाण्यास कारणीभूत ठरतात.

या सहलीचा मुख्य उद्देश म्हणजे भूगोल हा विषय विशेष स्तरावर अभ्यास करणाऱ्या विदयार्थ्यांना शैक्षणीक सहलीच्या मध्यमातून एखादया विशिष्ट स्थळांचे तेथील भौगोलिक परिस्थिती हवामानाचे आणि त्याचबरोबर तेथील व्यवसाय निसर्गनिर्मीत भौगोलिक गोष्टी यांचे भौगोलिक दृष्टया शास्त्रशुध्द अध्ययन करणे हा या सहलीचा महत्वपूर्ण उद्देश डोळयासमोर ठेवून सहलीला जाण्याचे ठरवले.

या भौगोलिक सहलीचे उद्देश पुढीलप्रमाणे :—

१. महाराष्ट्रातील सहयाद्री पर्वतराजीतील भूपृष्ठरचनेचा अभ्यास करणे.

२. सहयाद्रीतील हवामान व त्यांचा मानवी जीवनावर होणारा परिणाम यांचा अभ्यास करणे.

३. सहयाद्रीतील मृदा वैशिष्टयांचा अभ्यास करणे.

४. सहयाद्रीतील वनस्पती व प्राणी जीवन अभ्यासणे.

५. सहयाद्रीतील आर्थिक सामाजिक धार्मिक सांस्कृतिक, घटकांचा अभ्यास करणे.

६. सहयाद्रीतील महाबळेश्वर परीसरातील पर्यटन स्थळांचा अभ्यास करणे.

७. प्रतापगड किल्लयाची ऐतिहासीक पार्श्वभूमी समजावून घेणे.

# प्रकरण २ रे

# भौगोलिक माहिती

## भूपृष्ठरचना

महाराष्ट्राची प्राकृतिक रचना अतिशय वैशिष्टयपूर्ण आहे. भारताच्या प्राकृतिक विभागापैंकी दक्षिण भारतीय पठारी प्रदेश व पश्चिम किनारपट्टीचे मैदान या दोन विभागात महाराष्ट्राची प्राकृतिक रचना आहे. महाराष्ट्रचा संपूर्ण प्रदेश विस्तुत पठारी आहे.

सहयाद्री पर्वत व अरबी समुद्र यांच्या दरम्यान असलेल्या या लांबट चिंचोळया सखल भागालाच कोकण म्हणतात. सहयाद्री पर्वताचा प्रस्तर भंग होउन कोकण किनारपट्टी तयार झाली.

महाराष्ट्राचे प्राकृतिक दृष्टया प्रमुख ३ विभाग पडतात.

१ कोकण किनारपट्टी

२ सहयाद्री पर्वत, सातपुडा पर्वत डोंगररांगा

३ महाराष्ट्र पठार/दख्खन पठारी प्रदेश

वरील ३ विभागातील आम्ही सहयाद्री पर्वत आणि काही प्रमाणात दख्खनचे पठार या विभागातील घटकांचा अभ्यास केला. प्राकृतिक रचनेमध्ये पर्वत, पठारे व मैदाने यांचा अभ्यास केला जातो.

**१) पर्वत :—**

भारताच्या पश्चिम किनारपट्टीस समांतर सहयाद्री पर्वत आहे. हा पर्वत दख्खनच्या पठाराची परिश्चम सरहद्द निश्चित करतो. उत्तरेस तापी नदीपासून दक्षिणेस कन्याकुमारीपर्यत सहयाद्री पसरलेला आहे. त्याची लांबी सुमारे १६०० कि.मी. आहे. यापैंकी महाराष्ट्रात ४४० कि.मी. लांबीचा सहयाद्री पर्वत आहे. यास पश्चिम घाट या नावानेही ओळखले आहे. त्यांची सरासरी उंची १२०० ते १३०० मीटर आहे. सहयादीची उंची उत्तरेकडे वाढत जाते. तर दक्षिणेकडे कमी होत जाते.

सहयाद्री पर्वतात माळशेज, बोरघाट, आंबाघाट अंबोली घाट यासारखे महत्वाचे घाट आहेत. महाबळेश्वर आणि पाचगणी हे महाराष्ट्रात सातारा जिल्हयात पर्वत रांगेतील महाराष्ट्रातील सर्वात महत्वाचे थंड हवेचे ठिकाण याची उंची, समुद्रसपाटीपासून १४३८ मीटर आहे. महाबळेश्वर हे उंच ठिकाण असल्याने तापमान कमी व पाऊस अधिक असतो. निसर्गरम्य वनराई, खोल दऱ्या, कृष्णा, वेण्णा, गायत्री, सावित्री, कोयना या नदयांची उगमस्थाने पर्यटकांना आकर्षित करतात. महाराष्ट्रात सहयाद्री पर्वत हा मुख्य जलविभाजक आहे. सहयाद्री पर्वतातून उगम पावून दख्खनच्या पठारावरून गोदावरी, भीमा कृष्णा या नदया पूर्वेस तसेच आग्नेय दिशेस वाहत जातात. त्यांना पूर्ववाहिनी नदया म्हणतात. तसेच सहयाद्री पर्वत संपुर्ण ओलांडून कोकण किनारपट्टीवरून कोकणामध्ये वैतरणा, उल्हास, सावित्री या पश्चिमवाहिनी नदया अरबी समुद्रास येऊन मिळतात.

सहयाद्री पर्वताच्या ३ मोठया डोंगररांगा आहेत.

१) शंभु महादेव डोंगररांगा

२) हरिश्चंद्र — बालाघाट डोंगररांगा

३) सातमाळा अजिंठा डोंगररांगा

**२) पठारे :—**

सातारा जिल्हयात सहयाद्री पर्वतावर महाबळेश्वरपासून १८ किमी अंतरावर पाचगणी हे अत्यंत सुंदर थंड हवेचे ठिकाण आहे. याची उंची १३३४ मीटर आहे येथील निसर्गसौंदर्य पूर्वेस कृष्णेचे खोरे व पश्चिमेस कोकण किनारपट्टी येथील सपाट पठार हे 'टेबल लॅन्ड' म्हणून प्रसिध्द आहे. कोल्हापूर जिल्हयातील पन्हाळा हे थंड हवेचे ठिकाण ऐतिहासिक ठिकाण कोल्हापूर पासून २० कि.मी. अंतरावर आहे. येथील वनराई, बाजीप्रभूचा पुतळा, कोठारे, उदयान, सज्जाकोटी प्रेक्षणीस आहे. पाचगणी, हे अतिशय सलग व सपाट पृष्ठभाग असलेले दिसून येते. घाटमाथ्यावरून कोकणाकडे जाण्याचे सर्व मार्ग डोंगराळ प्रदेशाचा असलेला आपणास दिसतो.

**३) मैदाने :—**

समुद्र किनारी भागात मैदाने आढळतात. म्हणजेच समुद्रातील पाण्यात वाहून आलेला गाळ, वाळू, रेती, कण समुद्राच्या किनारी भागात येवून साचतात. त्यामुळे तेथे

सलग भुपृष्ठ तयार होत व कालांतराने मैदानी भाग तयार होतो व तो पर्यटकांच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे ठिकाण ओळखले जाते त्याचप्रमाणे आंम्ही पाहिलेल्या गणपतीपुळे या ठिकाणी हा भाग आम्हास निदर्शनास आला शक्यतो कोकण विभागात सलग सपाट व मैदानी प्रदेश अत्यंत अल्प प्रमाणात आढळतो. कोकण विभागात पर्वतीय व पठारी भाग मोठया प्रमाणात आढळतो. कोकण विभागाच्या पश्चिम भागात तेथील मैदानी प्रदेशात जांभी मृदा आढळून येते ही मृदा पिकांच्या दृष्टीने उपयुक्त नाही त्यामुळे या भागात पिक उत्पादन मोठया प्रमाणात घेतले जात नाही तसेच गूहाघर या ठिकाणी मैदानी प्रदेश आढळतो. परंतु एका बाजूने उंचावटा ही असलेला दिसून येतो कोकण भागात मैदानी प्रदेश अतिशय कमी प्रमाणात आढळलेला दिसतो.

## हवामान

महाराष्ट्राच्या हवामानावर महाराष्ट्राचे स्थान, प्राकृतिक रचना, पश्चिमेस असलेला अरबी समुद्र व विस्तृत प्रदेश याचा परिणाम झालेला आढळतो. त्यामुळे महाराष्ट्रात सर्वत्र सारख्या प्रकारचे हवामान आढळत नाही. महाराष्ट्राचे हवामान प्रामुख्याने मान्सून प्रकारचे आहे.

**हवामानाची वैशिष्टये :—**

- कोकणात उष्ण व दमट या प्रकारचे हवामान आहे.
- तसेच सहयाद्री पर्वतात आर्द्र व थंड, तर पठारावर उष्ण व विषम कोरडे हवामान आढळते.
- कोकणामध्ये बाष्पीभवन, सांद्रीभवन या क्रिया होत असल्याने तेथे पर्जन्य जास्त पडतो.
- सहयाद्री पर्वतातील महाबळेश्वर परीसरात जंगलाचे प्रमाण जास्त असल्याने तेथे पर्जन्य जास्त पडतो व थंड हवा जास्त असते. उदा :— सातारा जिल्हायातील महाबळेश्वराचे हवामान हे थंड प्रकारचे आहे.
- पश्चिम घाट हा प्रदेश उष्ण व दमट स्वरूपाचा असल्याने येथे पर्जन्य जास्त पडते.
- येथे उष्ण व दमट तसेच हिवाळयात थंड प्रकारचे हवामान असल्याने जंगलाचे प्रमाण अधिक आहे.

**तापमान :—**

कोकण किनापट्टीवर व अंतर्गत भागातील तापमानत बरीच तफावत आढळते. फेंब्रुवारी ते मे या काळात कोकणात कमाल ३०°ते ३३°सेल्सीअस किमान २६°तर पठारावर मध्ये महाराष्ट्रात कमाल ३५° सेल्सीअस ते ४०° सेल्सीअस व किमान २२° सेल्सीअस ते २५° सेल्सीअस तर विदर्भात कमाल ४३° सेल्सीअस ते ४८° सेल्सीअस तापमान आढळते.

महाराष्ट्रात दैंनिक तापमान कक्षेतही फरक आढळतो. कोकणात ५° सेल्सीअस ते ६° सेल्सीअस, मध्ये महाराष्ट्रात १५° सेल्सीअस, तर विदर्भात २८° सेल्सीअस ते २९°सेल्सीअस पर्यंत दैंनिक तापमान कक्षा आढळते. सहयाद्रीच्या घाटमाथ्यावर तर १०° सेल्सीअस पेक्षा कमी तापमान असते. उदा. माथेरान, लोणावळा, खंडाळा, इयांदी.

महाबळेश्वराचे हिवाळयातील सरासरी तपमान १७.४° सेल्सीअस, तर उन्हाळयातील सरासरी तपमान ३२.२° सेल्सीअस, असते. हे ठिकाण घाटमाथ्यावर असल्याने या ठिकाणी तपमान कमी असते आणि पर्जन्य अधिक असते.

**पर्जन्यमान :—**

जुन ते सप्टेंबर या काळात महाराष्ट्रात पावसाळा हा ऋतु आढळतो. परंतु जुलै व ऑगस्ट महिन्यात पावसाचे प्रमाण जास्त असते. त्यामुळे या महिन्यामध्ये कमाल तपमान २९° सेल्सीअस ते ३१° सेल्सीअस, किमान तपमान २४° सेल्सीअस, ते २६° सेल्सीअस, असते.

महाबळेश्वराचे वार्षिक सरासरी पर्जन्यमान सुमारे ६६३ सेमी. असून जुलैमध्ये तेथे सर्वाधिक पाऊस पडतो.

कोकण किनारपट्टीवर २५० ते ३०० से.मी, मध्य महाराष्ट्रात ५०ते ७५ से.मी, तर विदर्भात १०० ते १५० से.मी, पर्जन्य पडतो. कोकणात पावसाचे एकुण दिवस ७५ ते ९५, मध्य महाराष्ट्रात ३५ ते ५०, तर विदर्भात ६० ते ६५ आढळतात.

## मृदा

वनस्पतीच्या वाढीसाठी तसेच प्राकृतिक पर्यावरणातील मृदा हा एक सर्वात व अति महत्वाचा घटक आहे. कारण मृदा एक ही नैसर्गिक साधन संपत्ती आहे. तसेच मृदा पिके व वनस्पतीचा आधार आहे. मृदांमधून वनस्पतीना पोषक द्रव्ये पुरवली जातात. तसेच मृदेत असलेल्या हवा व पाण्यामुळे वनस्पतीशी वाढ होते. पण भारत हा शेती प्रधान देश असल्याने शेती विकासासाठी मृदेची माहिती घेणे आवश्यक आहे.

मृदा निर्मीतीमध्ये मुळ खडक, भुपृष्ठरचना, हवामान, वनस्पती, प्राणी, सुक्ष्मजीव इ. घटकांचा समावेश होतो. पण मुळ खडकांचे कायीक व रासायनिक अपक्षय होऊन खडकाना भुगा होतो. त्यातून मृदेची निर्मीती होत असते ते पुढील मुद्दयांच्या आधारे स्पष्ट होतो.

**१) गाळाची मृदा :—**

गाळाची मृदा नदयांनी वाहून आणलेल्या गाळापासून तयार होते. म्हणून ही मृदा प्रामुख्याने नदयांच्या सखल भागात तसेच किनारी भागात आढळते तसेच या मृदेमध्ये वाळू, चिकनमाती, व सेंद्रिय पदार्थांचे मिश्रण व पालाश चुना या समावेश जास्त प्रमाणात होत असतो तसचे ही मृदा करडया रंगाची असते ही मृदा प्रामुख्याने नदयांच्या प्रदेशात आढळून येते गोदावरी, भीमा, कोयना, कृष्णा, कावेरी इत्यांदी नदयामध्ये आढळून येते. महाराष्ट्रामध्ये कोल्हापूर, पुणे, सातारा, रायगड, रत्नागिरी, नाशिक, या जिल्हयातील नदयांच्या प्रदेशात मोठया प्रमाणात आढळून येते याशिवाय पंजाब, हरियाणा, तसेच राजस्थानच्या वायव्य भागात दिसून येते या मृदेने भारतात २२टक्के क्षेत्र गाळाने व्यापलेले आहे. तसेच या मृदेमध्ये गहू, तांदुळ उस, हरभरा, तंबाखु इत्यांदी पिके घेतली जाते.

**२) काळी मृदा :—**

ही मृदा बेसाल्ट खडकापासून तयार झालेली आहे. या मृदेमध्ये प्रामुख्याने चुना, मॅग्नेशियम कार्बोनेट, आयर्न ऑक्साईड व कुजलेल्या सेंद्रिय दव्यापासून तयार झालेली आहे. तसेच मॅग्नाईट या संयुगामुळे या मृदेला काळा रंग प्राप्त झालेली आहे. व मुदेमध्ये ओलावा टिकवून ठेवण्याची क्षमता जास्त प्रमाणात

असते. व या मुदेला उन्हाळयामध्ये भेगा पडतात. ही मृदा महाराष्ट्र, कर्नाटक, मध्यप्रदेश, गुजरात, आंध्रप्रदेश, इत्यांदी राज्यामध्ये दिसून येते ही मृदा सुपीक असल्याने या मृदेत कापासाचे पीक चांगले येते. म्हणून या मृदेला कापासाची काळी मृदा असे म्हणतात. या मृदेमध्ये, भात, ज्वारी, कडधान्ये, बाजरी इत्यांदी पिके घेतली जाते. व या मृदेने भारतात २९.१टक्के क्षेत्र व्यापलेले आहे.

**३) तांबडी मृदा :—**

या मृदेची निर्मीती प्रामुख्याने अतिप्राचीन रूपांतरीत स्फटीकमय खडकांपासून झालेली आहे. तसेच या मृदेत लोहसंयुगाचे प्रमाण जास्त असल्याने तिला तांबडा रंग प्राप्त झाला आहे. व या मृदेमध्ये ॲसिड, नायट्रोजन, फॉस्फरिस इत्यांदी सेंद्रिय द्रव्यांचे प्रमाण कमी आहे. या मृदेत वाळूचे प्रमाण अधिक आहे. तसेच ही मृदा भुसभुसीत असल्याने पाण्याचा निचरा अधिक होतो. महाराष्ट्रामध्ये रत्नागिरी, रायगड, सिंधुदुर्ग, पुणे इत्यांदी जिल्हयामध्ये असल्याचे दिसून येते या शिवाय भारतात उडिसा, मध्यप्रदेश, राज्यामध्ये आहे या मृदेमध्ये भुईमुग, उस, कापुस तांदुळ, इत्यांदी पिके घेतली जातात. या मृदेने भारतामध्ये २७.१ टक्के क्षेत्र व्यापलेले आहे.

**४) जांभी मृदा :—**

आलटून पालटून सतत ओला व कोरडा ऋतु असलेल्या उष्ण व जास्त पावसाच्या प्रदेशात या मृदेची निर्मीती ही होत असते. या मृदेत प्रामुख्याने अल्युमिनियम ऑक्साईड, व लोह या घटक द्रव्याचे प्रमाण जास्त असते. परंतु फॉस्फरीक ॲसिड व मॅग्नेशिय, नायट्रोजन यांचे प्रमाण अत्यल्प असल्याने या मृदेत सुपीकतेचे कमी असते त्यामुळे या मृदेचा रंग हा तांबुस करडा व पिवळसर असतो. ही मृदा प्रामुख्याने रत्नागिरी सिंधुदुर्ग, इत्यांदी जिल्हयामध्ये आढळून दिसून येते. तसेच या मृदेमध्ये चहा, रबर, सिकोना, आंबा, काजू इत्यांदी पिके घेतली जातात. भारतात या मृदेचे प्रमाण हे ३ टक्के असल्याचे दिसून येते.

## वनस्पती

महाराष्ट्रात प्राकृतिक घटक, हवामान, मृदा, यामध्ये ज्याप्रमाणे विविधता आढळते. त्याचप्रमाणे वनस्पती मध्ये देखील विविधता आढळते.

**१) उष्ण कटिबंधीय सदाहरित वनस्पती :—**

महाराष्ट्रात ज्या प्रदेशात २५० ते ६०० से.मी पर्जन्य पडतो. अशा प्रदेशात ही जंगले आढळतात. घाटमाथ्यावर साधारणत: १२०० ते १४०० मी. उंचीच्या प्रदेशात उतारावर ही जंगले आढळतात. घाटमाथ्यावरील महाबळेश्वर, खंडाळा, माथेरान, भिमाशंकर, आंबोली, पाचगणी तसेच सहयाद्री पर्वताच्या पश्चिम उतारावरील पायथ्यालगतच्या प्रदेशात या वनस्पती आढळतात. ही जंगले अत्यंत दाट असतात. या जंगलांमध्ये जांभुळ, नागचंपा, हिरडा, अंजन, फणस, कळंब, परजान, आंबा, देवघर, इत्यांदी वृक्ष आढळतात. त्याच प्रमाणे अनेक औषधी वनस्पती आढळतात. तसेच बामणी दिंडी, रामेठ, सुरगी, फापरी, फांगळा इत्यांदी प्रकारची झुडपे मोठया प्रमाणावर आढळतात.

**२)उष्ण कटिबंधीय निम सदाहरित वनस्पती :—**

ज्या प्रदेशात २०० ते २५० से.मी. पर्जन्य पडतो. अशा प्रदेशात अशा प्रकारच्या वनस्पती आढळतात. या जंगलातील वृक्ष वेगवेगळया हंगामात पान गाळताता या वनस्पती कोकण किनारपट्टी, सहयाद्रीच्या घाट माथा या प्रदेशात सदाहरति व पानझडी जंगलाच्या संक्रमण अवस्थेत आढळतात. ही जंगले थोडी फार दाट स्वरूपाची असतात या जंगलात आंबा, जांभुळ, रानफणस, कंद, किंजज, बिबला, किन्हाई इत्यांदी वृक्ष आढळतात हे वृक्ष जास्तीत जास्त किनारपट्टी प्रदेशात पहावयास मिळतात व संपुर्ण महाराष्ट्रात सहयाद्रीच्या घाटमाथ्यावर जास्त प्रमाणात हे वृक्ष पहावयास मिळतात.

**३) उष्ण कटिबंधीय पानझडी वनस्पती :—**

महाराष्ट्रात १५० ते २०० से.मी पर्जन्याच्या प्रदेशात या वनस्पती आढळतात तसेच डोंगर उतारावर या वनस्पती मोठया प्रमाणत आढळतात महाराष्ट्रात पश्चिमेकडील भागात पर्जन्य छायेच्या प्रदेशात या वनस्पती फार

मोठया प्रमाणात दिसून येतात यात प्रामुख्याने हळद, घावडा, आवळा, सादडा, चंदन, कुसुम, साबर इत्यांदी प्रकारची वनस्पती आढळतात.

**४) उष्ण कटिकबंधीय शुष्क पानझडी वनस्पती :—**

महाराष्ट्रात १०० ते १२५ से.मी पर्जन्य असण—या ही जंगले आढळतात पावसाळयात या वनस्पती हिरव्या गार तर उन्हाळयात पर्णहिन असतात व ही वृक्षे सलग पट्टयात आढळत नाही ठिक ठिकाणी विखुरलेली असतात. या साग, तिवस, बेल्हा, पळस, धावडा, इत्यांदी वनस्पती आढळतात व अशा जंगलांमध्ये अनेक दुर्मिळ औषधी वनस्पती आढळतात.

**५) उष्ण कटिबंधीय काटेरी वनस्पती :—**

सहयाद्री पर्वताच्या पुर्वीकडील अवर्षणप्रवण भागात ज्या ठिकाणी ५० से. मी. पेक्षा जास्त पाऊस पडत नाही अशा भागात या वनस्पती आढळतात यात बाभुळ, पळस, बोर, खैर, परवड, लिंबु, निवडुंग अशा प्रकारच्या सर्व काटेरी व फळत अवर्षणप्रवण प्रदेशात असणा—या वनस्पती आढळतात.

**६) खाजण किंवा समुद्रकाठच्या वनस्पती :—**

या वनस्पती प्रामुख्याने कोकण किनारपट्टीच्या पानथळी प्रदेशात आढळतात या वनस्पतीची मुळे इतर प्रदेशा प्रमाणे जास्त खोलवर जात नाही तर ती जमीनीवर दिसतात व ही झाडे ६ मी उंचीपर्यंत वाढतात या वृक्षांचा उपयोग म्हणजे समुद्र काठाकडून जी वारे किंवा वाळु गावापर्यंत पोहचु नये यासाठी या वनस्पती समुद्रकाठी जास्त प्रमाणात असतात यात तिवर, समुद्रफळ, काजळी इत्यांदी वनस्पती असतात. तर या वनस्पतीचा उपयोग जळावू लाकुड मिळविण्यासाठी तर माशाची जाळी घुण्यासाठी करतात.

इत्यांदी विविध प्रकाराच्या वनस्पती महाराष्ट्रात व प्रामुख्याने कोकण विभागात आढळतात.



१. महाबळेश्वर परीसरातील वनस्पती डोंगरकडे पावसाळयातील दृश्य



२. सहयाद्री पर्वतातील वनस्पती

# प्रकरण ३ रे

# आर्थिक घटक

## आर्थिक जीवन

प्राथमिक श्रेणीचे व्यवसाय :—

ज्या व्यवसायांमधून कच्या मालाची निर्मिती होते त्या व्यवसायांना प्राथमिक श्रेणीचे व्यवसाय म्हणतात. प्राथमिक व्यवसायात शेती, पशुपालन, शिकार, कंदामुळे व फळे गोळा करणे. जंगल व्यवसाय खाणकाम, मातकाम व मासेमारी यासारख्या निसर्गावर अधारीत व्यवसायांचा समावेश होतो. महाबळेश्वर आणि पाचगणी हे सहयाद्रीच्या माथ्यावर वसलेले आहे. त्यामुळे या ठिकाणी काही प्रमाणात शेती, वनसंकलन, पशुपालन, खाणकाम या सारखे प्राथमिक स्वरूपाचे व्यवसाय केले जातात.

**१. शेती :—**

महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यात असलेले महाबळेश्वर आणि पंचगणी हे त्यांच्या कृषी उत्पादनांसाठी, विशेषत: ''स्ट्रॉबेरी'', ''मलबेरी'' आणि ''रास्पबेरी'' साठी प्रसिद्ध आहेत. या टेकड्यांमध्ये थंड हवामान आणि सुपीक लाल माती आहे, ज्यामुळे ते फळे आणि भाज्या पिकवण्यासाठी आदर्श बनतात.

**परीसरातील प्रमुख कृषी उत्पादने**

१. **''स्ट्रॉबेरी''** — महाबळेश्वर भारतातील स्ट्रॉबेरी उत्पादनापैकी सुमारे ''८५ टक्के उत्पादन'' स्ट्रॉबेरीचे होते. उच्च दर्जाच्या स्ट्रॉबेरी, प्रामुख्याने ''स्वीट चार्ली'' आणि ''कॅमरोसा'' जातींच्या लागवडीसाठी हे हवामान परिपूर्ण आहे.

२. **''मलबेरी आणि रास्पबेरी''** — स्ट्रॉबेरीसोबत वाढवल्या जाणाऱ्या या बेरी महाबळेश्वर आणि परीसरातील प्रदेशाच्या समशीतोष्ण हवामानात वाढतात.

३. **''गुसबेरी आणि ब्लूबेरी''** — पर्यटकांच्या वाढत्या मागणीमुळे या पिकाची लोकप्रियता वाढत आहे.

४. **''टोमॅटो''** — पाचगणी परीसर हा उच्च दर्जाच्या टोमॅटो पिकाच्या उत्पादनासाठी ओळखला जातो. ज्याचा उपयोग बहुतेकदा सॉस आणि केचप उत्पादनात केला जातो.

५. **''गाजर, फ्रेंच बीन्स आणि शिमला मिरची''** — या भाज्या डोंगराळ भागात अधिक प्रमाणात पिकविल्या जातात.

६. **''कॉर्न (मका)''** — महाबळेश्वर आणि पाचगणी जवळच्या ग्रामीण भागात मका पिकाचे देखील मोठया प्रमाणात उत्पादन घेतले जाते.

या शिवाय फुले आणि औषधी वनस्पती याचीही शेती या भागात केली जाते. काही शेतकरी झेंडू, गुलाब आणि लेमनग्रास सारख्या औषधी वनस्पतींची लागवड देखील करतात. पाण्याची कमतराता आणि असमानता यामुळे या परीसरात पॉलीहाऊस शेती अधिक सामान्य होत चालली आहे, विशेषत: स्ट्रॉबेरीसाठी याचा मोठया प्रमाणात उपयोग केला जातो. असमान पर्जन्यामुळे

**महाबळेश्वर परीसरातील शेतीची वैशिष्टये**

१ असमान पाऊस आणि उतार असलेल्या भूभागामुळे ''ठिबक सिंचन'' मोठ्या प्रमाणात वापरले जाते.

२ भात हे परीसरातील प्रमुख पिक आहे. पावसाळयाच्या दिवसात भात या हेच या परीसरातील प्रमुख पिक असून या परीसरात सखोल शेती केली जाते.

३ बाजारपेठेतील मागणी पूर्ण करण्यासाठी सेंद्रिय शेती लोकप्रिय होत आहे.

४ कृषी—पर्यटन आणि स्ट्रॉबेरी शेतीचा अनुभव पर्यटकांना देण्यासाठी येथील शेती लोकप्रिय होत आहे.

५ महाबळेश्वर आणि पंचगणीमधील अनेक शेतांमध्ये पर्यटकांना भेट देण्याची, स्वत: स्ट्रॉबेरी निवडण्याची आणि सेंद्रिय शेतीबद्दल जाणून घेण्याची संधी मिळते.

६ पर्यटकांचा ओघ या परीसरात अधिक असल्याने पावसाळयानंतर भाजीपाला, मका, काकडी, गाजर या पिकांचेही उत्पादन अधिक प्रमाणात होते.



**३. महाबळेश्वर येथील स्ट्रॉबेरी शेती**

### ३. वनसंकलन :—

महाबळेश्वर परीसरात सहयाद्रीच्या जंगलामध्ये अनेक औषधी वनस्पती वेगवेगळी फळे मिळतात. औषधी वनस्पतींमध्ये हिरडा, बेहडा आणि सर्पगंधा या महत्वाच्या वनस्पती आहे. या वनस्पतीचा उपयोग रक्तदाब तसेच पोटविकारासाठी विकारासाठी चांगला होतो. धावल वनस्पतीचा उपयोग दम्याच्या विकारासाठी होतो. त्याचप्रमाणे रूंदती, कुडा, मुरूडशिंग, शेंडवेल, गोटवेल, कदंब, ब्रहमी वैगरे औषधी वनस्पती आढळतात. या प्रकारच्या वनस्पती ते लोक वनामधून मिळवितात. त्याचप्रमाणे बांबूची वने ही कोकणामध्ये आढळून येतात.

### ४. पशुपालन :—

महाबळेश्वर परीसरातील लोक भात शेती, कृषी पर्यटन या व्यवसायां व्यतिरिक्त शेतीस जोडधंदा म्हणून पशुपालन हा व्यवसाय करतात. यामध्ये कोंबडया, शेळया व मेंढया पाळणे दुध उत्पादन, या प्रकारचे प्राणी हे लोक पाळतात. पाचगणी परीसरात घोडे मोठया प्रमाणात पाळले जातात. या घोडयांचा उपयोग पर्यटकांना सवारी करण्यासाठी केला जातो. महाबळेश्वर आणि पाचगणी या ठिकाणी जास्त उंची असलेले खास घोडे पाळले जातात. त्यांची संख्या १००० हून अधिक आहे.

❖ **द्वितीयक श्रेणीचे व्यवसाय :—**

अ) **प्रस्तावना :—**

यांत्रिकीकरण व तंत्रज्ञानाच्या विकासामुळे विकसित खाणकाम, उदयोगधंदे वाढीस लागतात. द्वितीयक श्रेणीच्या व्यवसायासाठी कच्चामाल मजुर वर्ग, बाजारपेठ, आर्थिक स्थैर्य याची आवश्यकता असते. बहुसंख्या प्रक्रियात्मक आर्थिक व्यवसाय यामध्ये समाविष्ट होतात. विशेषत : प्राथमिक उत्पादनावर प्रक्रिया करून वस्तुचे उप्तादन केले जाते. या आर्थिक क्रियेमुळे लोकांना रोजगार व नोकरीची विविध क्षेत्र उपलब्ध होतात. सहाजिकच अशा प्रदेशात लोकसंख्येची घनता दाट ते अतिदाट लोकवस्ती देखील आढळते.

ब) **व्याख्या :—**

''कच्या मालावर प्रक्रिया करून त्यापासून पक्का माल मिळविणे म्हणजे द्वितीयक श्रेणीची व्यवसाय होय''

क) **उदाहरण :—**

चामडयापासून चप्पल बनविणे, लोखंडापासून विविध वस्तु बनविणे, फळांवरद प्रक्रिया करून त्यापासून विविध पदार्थ बनविणे.

ड) द्वितीयक श्रेणीचे व्यवसाय :—

१) **कारखानदारी :—**

सहयाद्री पर्वताच्या प्रदेशात कारखानदारचा फारसा विकास झालेला नाही परंतु या परीसरात थोडेफार कारखाने अन्न प्रक्रिया उद्योग, आणि लाकडी वस्तू बनविण्याचे कारखाने आढळतात. या सर्व उद्योगांना मोठया प्रमाणात स्थानिक बाजारपेठ उपलब्ध असल्याने बाहेरून कच्चा माल आणून देखील हे व्यवयाय या परीसरात केले जातात. पर्यटन व्यवसायाला पूरक पर्यटकांना वस्तू पुरविणारे अनेक कुटीर उद्योग या परीसरात भरभराटीला आल्याचे दिसून येतात.

२) **फळ प्रक्रिया उदयोग :—**

महाबळेश्वर परीसरात, स्ट्रॉबेरी, रासबेरी, गुसबेरी, आंबा, अननस, जांबूळ यांसारख्या फळांचे पीक येते. या फळांवर प्रक्रीया उद्योग मोठया प्रमाणात वाढीस

लागलेले आहेत. मॅप्रो कंपनी तसेच इतरही अनेक कंपन्या या परीसरात विकासीत झालेल्या आहेत.

३) **हस्तकला उदयोग :—**

महाबळेश्वर परीसरात छोटे छोटे हस्तकला उदयोग चालतात. लाकडापासून खेळणी बनविण्याचे उद्योग या परीसरात आहेत. महाबळेश्वरच्या माल्कम बाजारपेठेत याची अनेक दुकाने पहावयास मिळतात.

६) **वनोत्पादने :—**

महाबळेश्वर आणि पाचगणी परीसरात वनांचे घनदाट प्रमाण आहे. त्यामुळे वनसंकलन मोठया प्रमाणात केले जाते. संकलित केलेल्या वनांमधील रानमेव्यावर प्रक्रिया करून अनेक उत्पादने तयार केली जातात. यामध्ये विविध लोणच्याचे प्रकार, मध, रानऔषधी प्रक्रिया आणि पॅकेजिंग यांचा समावेश होतो.



**४. महाबळेश्वर बाजारपेठेतील लाकडी खेळणी आणि वस्तूंचे दुकान**

❖ **तृतीयक श्रेणीचे व्यवसाय :—**

प्राथमिक व द्वितीयक श्रेणीचे व्यवसाय भरभरटीस आल्यावर तृतीयक श्रेणीच्या व्यवसायांचा विकास होत जातो. यामध्ये वाहतुक संदेशवहन आणि पर्यटन यांचा समावेश केला जातो. महाराष्ट्र पठारावर तसेच महाबळेश्वर या भागात तृतीयक श्रेणीच्या व्यवसायाला भरपूर वाव आहे.

१. **वाहतुक :—**

आर्थिक विकास होण्यासाठी वाहतुक सोयी महत्वाच्या ठरतात. यामुळेच बाजारपेठांचा विकास होतो. महाराष्ट्रात वाहतुकीच्या सर्वसोयी असल्याने महाराष्ट्रचा विकास झालेला आहे. भौगोलिक मर्यादिमुळे रस्ते वाहतूक हा एकच पर्याय पाचगणी आणि महाबळेश्वर परीसरात आहे. परंतू पर्यटकांची संख्या अधिक असल्याने वाहतूकीवर अधारीत अनेक व्यवसाय या परीसरात पहावयास मिळतात.

**इतर सेवा व्यवसाय :—**

सेवा व्यवसायांचा तृतीयक तसेच चतुर्थ श्रेणीमध्ये समावेश होतो. महाबळेश्वर आणि पाचगणी ही डोंगराळ प्रदेशातील पर्यटन स्थळे आहेत. या ठिकाणी पावसाळयाचे दिवस वगळून वर्षभर लाखोंच्या संख्येने पर्यटक भेटी देत असतात. त्यामुळे सर्व प्रकारच्या सेवा व्यवसायांचा या ठिकाणी विकास झाला आहे. त्यामुळे पाचगणी आणि महाबळेश्वर या दोन शहरांची लोकसंख्या देखील वाढलेली आहे. महाबळेश्वर परीसरातील पर्यटन हाच प्रमुख व्यवसाय आहे. तर पाचगणी परीसरामध्ये पर्यटनाबरोबर निवासी शाळा हा प्रमुख व्यवसाय आहे. त्यामुळे पर्यटनावर अधारीत अर्थव्यवस्था असल्याने त्या संदर्भाने खाली या परीसारातील व्यवसाय स्पष्ट केलेले आहेत.

**पर्यटन :—**

**महाबळेश्वर पर्यटनावर अधारीत उद्योग**

**हिरव्यागार लँडस्केप्स, थंड हवामान आणि स्ट्रॉबेरी फार्मसाठी ओळखले जाणारे महाबळेश्वर हे महाराष्ट्रातील एक प्रमुख पर्यटन स्थळ आहे. ''पर्यटनाशी संबंधित व्यवसाय'' अनेक फायदेशीर व्यवसाय या ठिकाणी सुरू झालेले आहेत.**

**हॉस्पिटॅलिटी व्यवसाय**

**हॉटेल्स, रिसॉर्ट्स आणि होमस्टे**

**''लक्झरी रिसॉर्ट्स''** — श्रीमंत पर्यटक आणि प्रवासी प्रीमियम सेवांसह निसर्गरम्य रिसॉर्ट्समध्ये राहणे पसंत करतात. त्यामुळे अनेक रिसॉर्ट या ठिकाणी आहेत.

**''बजेट हॉटेल्स आणि लॉज''** — मध्यम आर्थिक स्थिती असणारे पर्यटक या प्रकारच्या परवडणारी बजेट हॉटेल्स आणि लॉज पसंत करतात. यांचीही संख्या पाचगणी आणि महाबळेश्वर परीसरात प्रचंड आहे.

**''होमस्टे आणि फार्मस्टे''** — इको—टुरिझममध्ये वाढ झाल्यामुळे, फार्मस्टे (विशेषत: स्ट्रॉबेरी फार्मवरील) यांच्या मागणीत प्रचंड वाढ झाल्याचे दिसून येते.

**''ट्रीहाऊसेस आणि ग्लॅम्पिंग टेंट''** — पर्यटकांमध्ये अलीकडील काळात या प्रकारची निवास व्यवस्था लोकप्रिय होत आहेत. त्यामुळे या प्रकारची सेवा देखील या परीसरात पुरवीली जाते.

**रेस्टॉरंट्स आणि कॅफे, खाद्य आणि पेय व्यवसाय**

**''स्ट्रॉबेरी—थीम असलेले कॅफे''** — ताजे स्ट्रॉबेरी मिष्टान्न, शेक आणि आईस्क्रीम देणे हे पर्यटकांमध्ये लोकप्रिय आहे.

**''महाराष्ट्रीयन थाळी आणि स्थानिक पाककृती रेस्टॉरंट्स''** — पिठले—भाकरी, मिसळ पाव आणि वडा पाव सारखे प्रामाणिक अन्न पर्यटकांचे आवडते आहे. प्रतापगड परीसरात पिठले भाकरी प्रसिध्द आहे.

**''चहा आणि कॉफी शॉप्स''** — महाबळेश्वर परीसरातील अनेक पर्यटन पॉईंटवर या प्रकारची शॉप्स उपलब्ध आहेत.

**''स्ट्रीट फूड स्टॉल्स''** — ''महाबळेश्वरी चना, कॉर्न, चिक्की आणि थंड गोळा आणि आइस्क्रीम'' हे व्यवसाय पाचगणी आणि महाबळेश्वरच्या मार्केटमध्ये सर्वाधिक लोकप्रिय आहेत.

**साहसी आणि निसर्ग पर्यटन**

**''ट्रेकिंग आणि कॅम्पिंग सेवा''** — प्रतापगड किल्ला, आर्थर सीट आणि लिंगमाला धबधब्यासाठी ट्रेक आयोजित केले जातात.

**''घोडा चालवणे आणि एटीव्ही राइड्स''** — पर्यटकांना घोड्यावरून किंवा एटीव्हीवरून टेकड्यांमध्ये फिरवून आणण्याचा यामध्ये समावेश होतो. अनेक लोक या व्यवसायांत गुंतलेले आहेत.

**''वेणा तलावावर नौकाविहार सेवा''** — खाजगी बोट राइड्स किंवा पॅडल बोट्सच्या साहयाने वेण्णा लेकमध्ये नौकानयन केले जाते.

**''सायकलिंग आणि बाईक भाड्याने देणे''** — बरेच पर्यटक भाड्याने घेतलेल्या सायकली किंवा मोटारसायकलवर फिरणे पसंत करतात. त्यानां सेवा पुरविण्यासाठी अनेक लोकांन या प्रकारचे उद्योग सुरू केले आहेत. सायकलसाठी दिवसाला २०० तर दुचाकी साठी १००० ते २००० रूपये आकारले जातात.

**कृषी—पर्यटन आणि शेती अनुभव''**

**''स्ट्रॉबेरी पिकिंग आणि शेती भेटी''** — पर्यटकांना स्ट्रॉबेरी पिकिंग आणि शेतीबद्दल शिकण्याचा आनंद मिळविण्यासाठी सेवा दिल्या जातात.

**''अॅग्रो—रिसॉर्ट्स''** — गायीचे दूध काढणे, भाजीपाला वेचणे इत्यादी उपक्रमांसह सेंद्रिय शेतांवर राहण्याची सुविधा. तसेच शेतीसंबंधी अनेक प्रथा आणि परंपरांची ओळख वहावी यासाठी कृषी पर्यटन व्यवसाय जोमाने विकसती झाल्याचे दिसते. विशेत: वाई परीसर आणि तापोळा परीसरात या व्यवसाची वाढ वेगाने झालेली आहे.

**''मध आणि जाम बनवण्याच्या कार्यशाळा''** — महाबळेश्वरचे प्रसिद्ध मध आणि जाम कसे बनवले जातात प्रत्यक्षात पहावयास मिळते. या क्षेत्रात रूची असलेल्या लोकांना तसेच पर्यटकांना या ठिकाणी प्रशिक्षणदेखील दिले जाते.

**प्रवास आणि वाहतूक व्यवसाय**

**''पर्यटक टॅक्सी आणि खाजगी कार भाड्याने देणे''** — अनेक पर्यटकांना प्रेक्षणीय स्थळांसाठी वाहतुकीची आवश्यकता असते. पर्यटकांच्या गरजेनुसार त्यांना कार किंवा बाईक्स उपलब्ध करून दिल्या जातात.

**''बाईक आणि स्कूटर भाड्याने''** — **त**रुण प्रवाशी तसेच पर्यटक या सेवेसाठी अधिक प्राध्यान्य देतात. पूर्वी गोवा किंवा भारतातील हिमालयाच्या परीसरातील पर्यटन स्थळांवर उपलब्ध असलेली ही सेवा आता महाबळेश्वर आणि पाचगणी परीसरात देखील पर्यटकांना उपलब्ध होऊ लागलेली आहे.

**''टूर गाइड सेवा''** — प्रतापगड किल्ल्यासारख्या ऐतिहासिक स्थळांना मार्गदर्शित टूर गाईड म्हणून अनेक लोक सेवा देतात. यामध्ये शासकीय आणि खाजगी अशा दोन्ही प्रकारच्या लोकांचा समावेश होतो.

**''स्मृतिचिन्ह आणि स्थानिक लाकडी उत्पादन व्यवसाय''** — महाबळेश्वर या ठिकाणी उच्च प्रतिचे शिसम, वेत आणि साग या वनस्पती मिळतात. त्यामुळे यांच्या लाकडावर कलाकुसर करणे. खेळणी बनविणे हे व्यवयाय या ठिकाणी चालता.

**''चिक्की, मध आणि जाम दुकाने'** — महाबळेश्वरमधील प्रसिद्ध ''मॅप्रो उत्पादने'' आणि मध विकणे हे देखील प्रसिध्द आहे.

**''हस्तकला आणि लोकरीचे कपडे''** — बरेच पर्यटक स्थानिक पातळीवर बनवलेले हस्तकलेवर अधारीत कापडे आणि हिवाळ्यातील कपडे विक्रीचा व्यवसाय मोठया प्रमाणात विकसीत झालेला आहे.

**''छायाचित्रण सेवा''** — निसर्गरम्य ठिकाणी त्वरित फोटो काढणे आणि त्याची प्रिंटिं काढून देणे हा देखील व्यवसाय अनेक लोक करताना दिसता.

**''रानमेवा विक्री''** — हा व्यवसाय हंगामी स्वरूपाचा असतो. हंगामानुसार जंगलातून मिळणाऱ्या खाण्यायोग्य पदार्थांची विक्री स्थानिक परीसरातील लोक रस्त्याच्या कडेने किंवा पर्यटन पॉईटवर करताना दिसतात. यामध्ये चिंचा, बोरे, करवंद, जांभूळ, स्ट्रॉबेरी, आणि इतर बेरीचे प्रकार, कैरीच्या फोडी, भाजलेल्या तसेच उकडलेल्या शेंगा, दही, ताक, आणि भाजीपाला अशा अनेक घटकांचा समावेश होतो.

महाराष्ट्राच्या भौगोलिक रचनेमुळे येथे अनेक पर्यटन स्थळे तयार झालेली आहे. त्यामध्ये महाराष्ट्रात पश्चिमेच्या बाजूस अधिक पर्यटन स्थळे दिसून येतात. पर्यटन या व्यवसायातून आर्थिक विकास घडून येतो. पर्यटनामुळे व्यापाराचा विस्तार होतो. तसेच आंरतराष्ट्रीय पर्यटनामुळे परकीय चलन मिळते. महाराष्ट्र हे धार्मिक, ऐतिहासिक, भौगोलिक पर्यटनाच्या दृष्टीने महत्वाचे राज्य आहे.



**५. महाबळेश्वर — सहयाद्री पर्वतातील डोंगरकडे**




**६. महाबळेश्वर — माल्कम बाजारपेठ**

# प्रकरण ४ थे

# पर्यटन विषयक घटक

## १) महाबळेश्वर



**७. महाबळेश्वर वेण्णा सरोवरात विद्यार्थी जलविहार करताना**

महाबळेश्वर हे महाराष्ट्रातील थंड हवेचे ठिकाण आहे महाबळेश्वरशिवाय माथेरान, लोणावळा, खंडाळा, चिखलदरा, ही देखिल थंड हवेची ठिकाणे आहे. महाबळेश्वरला इंग्रजांनी थंड हवेचे ठिकाण म्हणून घोषित केले आहे.

भारतात निसर्गाने प्राकृतिक सौदर्याची अगदी मुक्तहस्ते उधळण केली आहे. महाराष्ट्र विशेषत: कोकणची किनारपट्टी पश्चिम घाट हे प्रदेश या दृष्टीने समृद्ध आहेत. कोकणची उंच सखल हिरवीगार भूमी, नारळ, पोकळी, आंब्याच्या बागा लाल मंगलोरी कौलांच्या छप्परांची घरे, अथांग निळा समुद्र नदयांच्या खाडया असे हे कोकण दृश्य मनोरम आहे. पश्चिम घाट देखील हिरवागार आहे मधून मधून खाले द—या व त्यातून वाहणा—या नदया, ठिकठिकाणी कोसळणारे जलप्रपात घाटमाथ्यावर असलेली थंड हवेची ठिकाणे ही या प्रदेशाची प्राकृतिक वैशिष्ये आहेत.

**स्थान :—**

महाबळेश्वर हे ठिकाण सहयाद्री पर्वताच्या रांगांमध्ये सतारा जिल्हयात महाबळेश्वर तालुक्यात वसले आहे. हे साता—याच्या वायव्येस ५३ कि.मी व पुण्यापासून नैऋत्येस १२१ कि.मी अंतरावर आहे. पश्चिम घाटाच्या सहयाद्री

पर्वततरांगामधील एका विस्तृत सपाट पृष्ठभागाच्या सोंडेवर १३७२ मी उंचीवर महाबळेश्वर वसले आहे. सिंदोला टेकडी हे येथील सर्वाच्च तर कॉनॉट शिखर हे दुसरे उल्लेखनीय शिखर होय. पश्चिम घाटातील सर्वात उंच असलेले हे एक थंड हवेच ठिकाण आहे सहयाद्री पर्वतात १४३८ मीटर उंचीवर वसलेले असून ब्रिटीशांच्या काळात हे महाराष्ट्राचे उन्हाळी राजधानीचे ठिकाण होते. महाराष्ट्रातील थंड हवेच्या ठिकाणांचा राजा म्हणून महाबळेश्वराला मान दयावा लागेल हे पर्यटन स्थळ साता—यापासून ५० कि.मी. पुण्यापासून ११५ कि.मी. तर मुंबईपासून २४५ कि.मी. अंतरावर आहे.

**हवामान:—**

महाबळेश्वराचे वार्षिक सरासरी पर्जन्यमान सु.६२३.से.मी असून जूलैमध्ये तेथे सर्वाधिक पाऊस पडतो. हिवाळयातील सरासरी तपमान १७.४ अंश सेल्ससिअस तर उन्हाळयातील सरासरी तपमान ३२.२ अंश सेल्ससिअस असते. हे ठिकाण घाटमाथ्यावर असल्याने या ठिकाणी तापमान खुप कमी असते. पर्जन्य खुप अधिक असतो. येथील द—याखो—या शिखरे, हिरवीगार डोंगर अतिशय विलोभनीय आहेत पावसाळयात पडणा—या पावसाची सरी, हिवाळयातील दरम्यान डोंगरमाथ्यावरील धुके यांचे दृश्य अतिशय मनमोहक असते. मार्च ते मे या काळात पर्यटकांची जास्त वर्दळ असते.

**भुरचना :—**

महाबळेश्वर हे ठिकाण सहयाद्रीच्या कडयावर वसले आहे. समुद्र सपाटी पासून हे ठिकाण १४३ कि.मी. उंचीवर आहे. महाबळेश्वर परिसरात सहयाद्री पर्वताचे दोन टप्पे असलेले दिसून येतात पहिला टप्पा कोकणापासून प्रतापगडाच्या पायथ्यापर्यत आहे. दुसरा टप्पा कोयना नदीपासून महाबळेश्वरपर्यंत आहे. महाबळेश्वर येथील सहयाद्री पर्वताचे उंचच्या उंच कडे असून मध्ये मध्ये खोल द—या हआहे. महाबळेश्वर आणि प्रतापगड यांच्या दरम्यान कोयना नदीचे खोरे आहे. यालाच जावळीचे खोरे असे म्हणतात. हे खोरे घनदाट अरण्याने आच्छादले आहे. महाबळेश्वरची पर्वतरांग बनलेली असून ती बेसॉल्ट या खडक प्रकारातील आहे.

**जंगल व वनसंपदा :—**

भरपूर पर्जन्यामुळे महाबळेश्वरचा संपुर्ण परिसर दाट वनश्रींनी वेढलेला असून अनेकविध वनस्पती प्रकार येथे आढळतात. त्यात जांभूळ, ओक, हिरडा, अंजन, आंबा, बेहडा, वरस, कारवी यांचे प्रमाण बरेच असून आर्थिक दृष्टया या महत्वाच्या आहेत. जंगलात, बिबटया तरस, कोल्ह, ससे, रानडुक्कर, वानर, माकडे, इत्यादी प्राणी व वेगवेगळया प्रकारचे साप आढळतात महाबळेश्वरच्या पक्ष्यामध्ये बूलबुल, स्परफाडल, बड ऑफ पफॅरड, सोनेरी हळदी, पाण कावळा, सुतार पक्षी, सारिका पक्षी, कोकिळा तसेच हनीसकर यांसारखे विविध प्रकारचे पक्षीही दिसून येतात.

**महाबळेश्वरचे महत्व :—**

महाबळेश्वर हे धर्मिक प्राकृतिक आणि पर्यावरणीय दृष्टीने महत्वाचे ओ. महाबळेश्वरला शंकराचे प्राचीन असे स्वयंभू लिंग आहे. या संदर्भात अशी कथा सांगितली जाते की पूर्वी महाबळ आणि अतिबळ हे दोन दैत्य फार मातलेले होते त्यांनी मानवास त्रास दयायला सुरूवात केली म्हणून शंकराने अवतार घेऊन या २ दैत्यांचा बंदोबस्त केला. महाबळ दैत्याच्या नावावरून त्या स्थानाला महाबळेश्वर असे नाव पडले हे अतिशय प्राचीन आणि पवित्र ठिकाण असल्याने येथे भाविक लोक दर्शनाला येतात. महाबळेश्वरची मुख्य ठिकाणे २ आहे १) जुने महाबळेश्वर, २) नवे महाबळेश्वर जुन्या महाबळेश्वरामध्ये शंकराचे स्वयंभु स्थान आहे तेथेच पाच नदयांच्या उगम असणारी पंचगंगा नदी आहे. पंचगंगा नदीमध्ये कृष्णा, वेन्ना, सावित्री, गायत्री आणि कोयना या ५ नदयांचा उगम होतो यापैंकी कृष्णा व वेन्ना या नदया पूर्वेकडे वाहत यतात या पूर्व वाहिनी नदया आहे तर गायत्री सावित्री कोयना या पश्चिमेकडे वाहत जातात म्हणून या पश्चिम वाहिनी नदया आहेत.

महाबळेश्वर हे थंड हवेचे ठिकाण आहे. इंग्रजांच्या काळापासून येथे पर्यटन करण्यासाठी लोक येतात. महाबळेश्वर येथे ६६३ से.मी पाउस पडतो सुदंर निसर्ग, शुद्‌ध शितल निरोगी हवा ही महाबळेश्वरची वैशिष्टये ओ. पाणी नेहमी गार आणि गोड असेते. तांबडी माती प्रदुषण विरहित हवा शुद्‌ध पाणी यामुळे

येथे उत्कृष्ट भाजीपाला व फळे येतात. तुती,गाजरे, बटाटे, स्ट्रॉबेरी, गुजवेल, जांभळे, करवंदे ही येथील प्रमुख फळे आहेत. महाबळेश्वरमध्ये सुंदर आणि लाकडी वस्तुच्या बाजारपेठा आहेत.

**महाबळेश्वरचा इतिहास :—**

शहरापासून उत्तरेस सुमारे ४ कि.मी वर जुने क्षेत्र महाबळेश्वर आहे. यावरून या गिरिस्थानाला महाबळेश्वर हे नाव पडले महाबळेश्वराच्या मंदीराजवळ कृष्णाबाई व अतिबलेश्वर (विष्णू) ही दोन मंदीरे आहेत. कृष्णाबाई मंदिरात कृष्णा, कोयना, वेण्णा, गायत्री व सावित्री हया पाच नदयांची उमगस्थाने दर्शविली जातात. तीन मीटर अंतरावर या पाच नदयांचे पाणी एसत्र येऊन येऊन एका गोमुखातून एका कुंडांत पडते व त्यातून दुस—या कुंडात जाते. याला ब्रहमकुंड असे म्हणतात.याशिवाय दर १२ वर्षांनी प्रकटणारी भागीरथी व दर ६० वर्षांनी प्रकटणारी सरस्वती या दोन नदया वरील पंचनदयांच्या दोन्ही बाजूस असल्याचे भाविक मानतात. महाबळेश्वर अथवा अतिबळेश्वर ही 'महाबळ' व 'अतिबळ' या दोन बलवान व शुर अशा राक्षस बंधुवरून आली, अशी अख्यायिका आहे फाल्गुन महिन्याच्या वदय पक्षात पाच दिवस कृष्णाबाईचा उत्सव, आश्विन महिन्याच्या वदय पक्षात दहा दिवस नवरात्र व माघ महिन्यात सात दिवस शिवरात्री असे तीन उत्सव दरवर्षी येथे होतात. येथे माणिकबाई व गंगाबाई हिंदू आरोग्यधाम आहे.

यादव कालापासून महाबळेश्वरचा उल्लेख होतो साता—याच्या राजाकडून येथील सृष्टि सौंदर्याचे वर्णन ऐकल्यावरून जनरल लॉडविक याने १८२४ मध्ये या भागाची पायी कुटी उभारली व सात—याच्या महाराजांना साता—यापासून येथपर्यंत रस्ता बांधण्यास प्रवृत्त केले. १८२७ मध्ये मुंबईचा गव्हर्नर सर जॉन मॅल्क्म याने युरोपीय सौनिंकाकरिता एक रूग्णालय बांधले १८२८ मध्ये मॅल्कम पुन्हा येथे आला येताना त्याने डॉ. विल्यमसन याला आणले येथील हवामानाच्या परिस्थितीचा अहवाल देण्यासाठी त्याची येथेच नेमणुक केली. सरकासरकडून भाजीपाला उत्पादनात चिनी गुन्हेगारांचा उपयोग करून घेण्यात येऊ लागला. काही कालावधीतच एक प्रसिद्ध गिरिस्थान म्हणून माल्कमपेठ भरभराटीस आले.

कोळी, धनगर, धावड व कुळवाडी या येथील मुळच्या जमाती आहेत. चिनी व मलायी कैदी ठेवण्याकरिता येथे १२० कैदी राहतील. एवढा मोठा कैदखाना बांधण्यात आला होता. येथील कैदयांनी बटाटयाची आणि विलायती भाजीपाल्यांची लागवड उर्जिवास्थेस आणली. १८६४ मध्ये हा कैदखाना बंद करण्यात आला.

**सौंदर्य पर्यटन स्थळे :—**

महाबळेश्वरमध्ये पर्यटकांची आवडती अशी अनेक सौंदर्यस्थळे आहेत. उदा. आर्थरसीट पॉइंट, एलाफिन्स्टन पॉइंट, सिडनी पॉइंट, लॉडविक पॉइंट, बॉबे पॉइंट, कार्नाक पॉइंट, फॉकलंड पॉइंट, ससून बॅबिंग्टन पॉइंट, केट्स पॉइंट, सिंदोळा पॉइंट, विल्सन पॉइंट क्षेत्र महाबळेश्वर वेण्णा लेक, प्रतापसिंह उदयान, वेण्णा लेक, लिंगमळा धबधबा ही महाबळेश्वर येथील सौंदर्यस्थळे असून प्रतापगड, मकरंदगड, कमळ गड, पाचगणी ही परिसरातील सौंदर्यस्थळे आहेत. ब्रिटीश अधिका—याच्या गौरवार्थ त्यांच्या नावांनीच ही सौंदर्यस्थळे ओळखली जातात. बॉबे पॉइंटवरून सूर्यास्ताचे दृश्य पाहण्यास पर्यटक विशेष उत्सुक असतात. आर्थरसीटपासून ६० मी असलेला झरा, कट्स पॉइंट येथील नीडल होल, वेण्णा सरोवरातील नौकाविहार व जवळच असलेला लिंगापळा धबधबा (१५२ मी) व त्याचा परिसर ह पर्यटकांची प्रमुख आकर्षण होत.



**८. महाबळेश्वर डोंगररांगा**

**२.पाचगणी**

महाबळेश्वर इतकेच उंच असलेले आणखी एक थंड हवेचे ठिकाण म्हणजे पाचगणी होय. महाबळेश्वर हे ठिकाण अवघ्या १४३८ मी. उंचीवर आहे. तर पाचगणी हे १३४० मी उंचीवर आहे. महाबळेश्वर इतकेच निसर्ग सुंदर असलेले हे ठिकाण येथील पब्लिक स्कुलसाठी खुप प्रसिध्द आहे. जुन्या काळात येथे पारशी लोकांनी बांधलेले बंगले आजही लक्ष वेधुन घेतात. पाच डोंगराच्या समुहावर हे ठिकाण विकसीत झालेले असल्याने त्याला 'पाचगणी' नाव पडले असावे.

**पाचगणीचा इतिहास :—**

निसर्गरम्य पाचगणीचा शोध ब्रिटीशांनी लावला होता. उन्हाळयात उपाय म्हणून ते येथे येत असत. १८६० मध्ये थंड हवेचे ठिकाण म्हणून प्रसिध्द झाले. पाचगणी मध्ये पश्चिम जगातील अनेक वनस्पतींची लागवड येथे केली. जसे की, चांदी ओक, च्वपदेमजजं, ब्रिटीश अधिकारी निवृत्त झाले की, येथे स्थायिक होत असत. पाचगणीचे नाव धांडेघर, गोडवली, अमराळ, खिंगर व ताईघाट या पाच गावावरून पडले.

**भूगोल आणि हवामान :—**

पाचगणी हे पाच टेकडयांच्या मध्यभागी आहे ते सहयाद्री पर्वत रांगेत वसलेले आहे. पाचगणी जवळूनच कृष्णानदी जाते. या नदीवर पुढे 'डोमधरण' आहे. ते वाईपासून ९ कि.मी. अंतरावर आहे.

**पाचगणीच्या सीमा :—**

मुंबईपासून २८५ कि.मी., पुण्यापासून १०० कि.मी., महाबळेश्वरपासून १८ कि. मी., सातारापासून ४५ कि.मी., वाईपासून १० कि.मी. अंतरावर आहे.

**पाचगणीचे तापमान :—**

पाचगणीमध्ये १२° तापमान हिवाळयात तर उन्हाळयामध्ये ३४° तापमान असते. मात्र आर्द्रता फार कमी असते.

हे अशियातील दुस—या क्रमांकाचे एक स्फोटक पठार आहे.

**पाचगणी लोकसंख्या :—**

जनगणनेनुसार पाचगणीची लोकसंख्या २,२२९ इतकी ीती. ८३३५ महिला व १४८९४ पुरूष आहे. तसेच लिंग गुणोत्तर हे ७४४ व साक्षरता प्रमाण हे ९२.४९ टक्के आहे.

**पर्यटन आकर्षणे :—**

१. सिडनी पॉईंट :— हा पॉईंट कृष्णा खोरे तोंड टेकडीवर वसलेला आहे. येथून भव्य निळे  पाणी पाहता येते.

२. टेबल लॅंड :— सपाट जमिन, उष्ण कटीबंधातील देशामध्ये रस्त्यासाठी वापरली जाणारी एक लाल प्रकारची माती येथे आहे.

३. पारशी पॉईंट :— डोम धरण आणि निळे चमकदार पाणी.

४. भूतच्या किचन :— ही सपाट जमिन दक्षिण या ठिकाणी वसले आहे. कारण हे सैतान किचन आहे. हा एक पौराणिक तो संबंधित आहे.

५. माप्रो गार्डन :— पाचगणी आणि महाबळेश्वर दरम्यान सुडौल रस्ते वसलेले आहे.

६. शाळा :— पाचगणी मध्ये अनेक प्रसिध्द बोर्डिंग शाळा आहे. यांची स्थापना १९ व्या शतकात झाली आहे. या प्रदेशासाठी मुंबई व पुणे सारख्या शहरातून मोठया प्रमाणात विदयार्थी येतात.

७. छोरी महोत्सव पाचगणी :— पाचगणी हे फक्त थंड हवेचे ठिकाण नसून ते स्ट्रॉबेरीसाठी प्रसिध्द आहे. दरवर्षी उन्हाळयात स्ट्रॉबेरी महोत्सव आयोजित केला जातो.




**९. पागचगणी महाबळेश्वर — मॅप्रो गार्डन**

## ३. वाई

वाई मधील घाट हे पुर्वी उपासनेसाठी वापरण्यात येत असत. पेशव्यांच्या या शहरामध्ये धार्मिक कार्यासाठी मोठया प्रमाणावर वापर होता. त्यामुळे येथील मंदिराच्या रचना पेशवेकाळाची साक्ष देतात. पुणे ते वाई हे अंतर कमी असल्याने पेशव्यांनी या शांत व निसर्गरम्य परिसराचा उपासनेसाठी निवड केली असे स्थानिक अभिमानाने सांगतात. घाटावर वसलेली गणपती, विष्णू आणि लक्ष्मी यांची मंदिर स्थापत्यकलेचा उत्त्कृष्ट नमुना आहे. या सगळया मंदिराच्या शैलीमध्ये समानता आहे. धातूवरील कलाकुसर, लाकडी स्तंभाची कलात्मक वापर आणि पाषाणाने दिलेले अर्भेदयपण हे यांचे वैशिष्टय या मंदिरामध्ये लक्ष्मीचे मंदिर विशेष प्रसिध्द आहे. उपलब्ध पराण्यानुसार हे मंदिर आनंदराव रास्ते यांनी १७७८ मध्ये बांधले. रासत्यांनी लक्ष्मीला दागदागिन्यांनी मढविले. तेवढेच नाहीतर पुजा अर्चा व उपचारांची कायमची सोय करून ठेवली.

मंदिराच्या प्रवेशाचा पश्चिमाभिमुख दरवाजा आहे. यानंतर येतो प्रशस्त सभामंडप. पाच स्तंभ असलेल्या या सभा मंडपाला काहीशा निमुळत्या असलेल्या छतामुळे गुहेसारखा आकार आलेला आहे. मंदिराच्या मुख्य शिखराला साठ उपशिखरे आहेत. या शिखरावरचे नक्षीकाम मराठा स्थापत्य शैलीचे उत्तम उदाहरण होय. उपशिखरांच्या चारही बाजूंना छत्र्या कोरलेल्या आहेत. तसेच भौमितीक आकृत्यांचा वैविध्यपुर्ण वापर करण्यात आला आहे. शिखराची रचना लक्ष्मी यंत्रासारखी करण्यात आली आहे. हे शिखर अठरा मीटर उंच आहे. व एकोणीसाव्या शतकामध्ये महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी होती. याच्या खुणा आजही जागोजाग पहायला मिळतात. कृष्णेच्या तीरावर वसलेली वाई जसे जसे ऐतिहासिकदृष्टया प्रसिध्द आहे. तसेच्या इथल्या वैशिष्टयपुर्ण घाटासाठी आणि मंदिरासाठी हे कृष्णा काठचे ‘दक्षिण काशी’ म्हणून प्रसिध्द असलेले पर्यटन स्थळ म्हणजे वाई होय.

वाई हे ठिकाण कृष्णा नदीच्या काठावर वसलेले आहे. या ठिकाणी असलेले काशी विश्वेश्वराचे मंदिर तसेच गणपतीचे मंदिर ढोल्या गणपती म्हणून प्रसिध्द आहे. या मंदिरातील गणपतीची मुर्ती भव्य आहे. वाईच्या परिसरामध्ये अनेक मराठी, हिंदी, तमिळ, भोजपुरी, कन्नड भाषेतील चित्रपटांचे चित्रीकरण झालेले आहे. पाचगणी व

महाबळेश्वरला गेलेल्या पर्यटकांचे पर्यटन वाईच्या गणपतीच्या दर्शनानेच पुर्ण होते. त्याचप्रमाणे आमच्या पर्यटनाचा शेवट देखील वाईच्या गणेशाच्या दर्शनाने पूर्ण झाला.

वाई सातारा जिल्हयातील एक तालुका व महत्वाचे शहर आहे. कृष्णा नदीच्या काठावर असलेले वाई हे गाव आहे.

सरदार रास्ते यांनी १७६२ मध्ये एकाच दगडातून सलगपणे घडविलेली वाईचे ग्रामदैवत असलेली ढोल्या गणपतीचे मंदिर प्रसिध्द आहे. वाई येथील वैशिष्टय म्हणजे श्री सिध्देश्वर मंदिरातील श्री सिध्दनाथांची संजीवन समाधी. गंगा रामेश्वर , काशी विश्वनाथ, लक्ष्मी नारायण, समर्थ रामदासांनी स्थापन केलेले रोकडोबा हनुमानाचे मंदिर. वाई येथूनच मराठी विश्वकोषाचे प्रकाशन केले जाते.

- इतिहास :—

  सातारा जिल्हयातील वाई हे गाव अठरव्या शतकापासून खुप प्रसिध्द आहे. नदीवरील घाट आणि सर्वांत वरचा आकार कलशांच्या आकाराचा आहे. गाभा—यामध्ये लक्ष्मीची काळया पाषाणातील मुर्ती आहे. तिच्या हातात ढाल, तलवार आदी आयुध धारण केली आहेत. या लक्ष्मीला सोनेरी पैठणी, नक्षीदार सोन्याचा मुकूट आणि प्रभावळ पेशव्यांच्या काळातील कलात्मकतेचे दर्शन घडविते. देवीची पुजा, उत्सव, सणवार नियमितपणे पार पाडले जाते. सभामंडपामध्ये किर्तन, भजन हे होते. त्यादृष्टिने या सभामंडपाची रचना करण्यात आली आहे. येथे आवाज घुमत असल्यामुळे ध्वनि प्रक्षेपका शिवाय शेवटच्या श्रोत्यांपर्यंत आवाज पोहचू शकतो.



**१०. वाई — गणेश मंदीर व कृष्णा काठ**

## ४. भिलार — महाराष्ट्रातील पुस्तकांचे गाव

महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यातील भिलार या छोट्यशा गावाला **‘भारतातील पहिले पुस्तकांचे गाव’** असे नाव देण्यात आले आहे. वेल्समधील हे—ऑन—वाय या संकल्पनेने प्रेरित होऊन, महाराष्ट्र सरकारने भिलारला पुस्तकप्रेमींसाठी एका पर्यटन स्थळात रूपांतरित केले. भिलारचे एक अद्वितीय पर्यटन स्थळ म्हणून महत्त्व, स्थानिक समुदायावर त्याचा प्रभाव आणि परीणाम होऊन शाश्वत पर्यटन विकास भिलार या गावामध्ये झाल्याचे पहावयास मिळते. भिलार या गावाला सप्टेंबर ते मे दरम्यान अनेक लोक भेटी देत असतात. महाराष्ट्र सरकारने ४ मे १९१७ रोजी लोकार्पण केले आहे. पुस्तकांच्या गावांच्या आंतरराष्ट्रीय संकल्पनेने प्रेरित होऊन २५ हून अधिक ठिकाणे (घरे, शाळा आणि सार्वजनिक जागा) वाचनस्थळांमध्ये रूपांतरित केले आहे. यामध्ये साहित्य, इतिहास, विज्ञान आणि संस्कृती यासारख्या विविध शैलींचा समावेश असलेली मराठीतील १५०००० पर्यटकांना पाहण्यासाठी उपलब्ध आहेत.

**भिलार गावाची काही वैशिष्टये आणि पर्यटन विकासाचा परीणाम**

अ. वाचन क्षेत्रे — गावातील विविध ठिकाणी पसरलेली खुली ग्रंथालये आणि नैसर्गिक परिसरात पुस्तक वाचनासाठी शांत वातावरण

ब. भित्तीचित्रे आणि सांस्कृतिक प्रदर्शने — मराठी साहित्य आणि लेखकांचे चित्रण करणारी सुंदर भिंतीवरील चित्रे. कलात्मक प्रतिनिधित्व जे वाढवतात गावाचे सांस्कृतिक मूल्य.

क. स्थानिक मंदिरे आणि वारसा स्थळे — भिलारमध्ये प्राचीन मंदिरे आणि पारंपारिक घरे देखील आहेत, जी ग्रामीण महाराष्ट्राची झलक दाखवतात.

ड. आर्थिक फायदे — पुस्तक पर्यटन आणि होमस्टेद्वारे स्थानिक रोजगार वाढला. स्थानिक हस्तकला, खाद्यपदार्थांचे स्टॉल आणि लहान व्यवसायांमध्ये वाढ झाली आहे.

इ. शैक्षणिक आणि सांस्कृतिक विकास — स्थानिक आणि पर्यटकांमध्ये साक्षरतेबद्दल जागरूकता वाढली. प्रोत्साहित मराठी साहित्य आणि प्रादेशिक लेखक निर्मितीस प्रोत्साहन मिळाले.

ई. शाश्वत पर्यटन उपक्रम — योग्य कचरा विल्हेवाट सुविधांसह जबाबदार पर्यटनाला प्रोत्साहन देणे. सांस्कृतिक सार जिवंत ठेवण्यासाठी साहित्यिक कार्यक्रमांचे आयोजन करणे. सरकार वाचन क्षेत्रे राखण्यासाठी आणि विस्तारित करण्यासाठी मदत करत आहे.

भिलारने पर्यटनाला साहित्य आणि संस्कृतीशी कसे जोडले जाऊ शकते याचे यशस्वीरित्या उदाहरण मांडले आहे. भारतातील पहिले पुस्तक गाव म्हणून, ते पुस्तकप्रेमी आणि पर्यटकांसाठी एक अद्वितीय अनुभव देते. गावाने लक्षणीय आर्थिक आणि शैक्षणिक फायदे पाहिले आहेत, परंतु त्याची सांस्कृतिक अखंडता राखण्यासाठी शाश्वत पर्यटन पद्धती आवश्यक आहेत. भविष्यातील उपक्रमांनी पर्यटकांचा अनुभव वाढवताना त्याचे साहित्यिक सार जपण्यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे.




**११. पुस्तकांचे गाव — भिलार**

## ५. मांघर – महाराष्ट्रातील मधाचे गाव

महाराष्ट्रातील सह्याद्री पर्वतरांगांमध्ये वसलेले मांघर हे एक छोटेसे गाव आहे, जे मध उत्पादनासाठी प्रसिद्ध आहे. **'मधाचे गाव'** म्हणून प्रसिद्ध असलेल्या मांघरने त्याच्या अद्वितीय मधमाशी पालन पद्धती आणि शाश्वत मध संकलन तंत्रांसाठी ओळख मिळवली आहे. पर्यटन स्थळ म्हणून गावाचे महत्त्व, स्थानिक अर्थव्यवस्थेवर त्याचा परिणाम झालेला आहे. पर्यावरणीय पर्यटनाचे महत्त्व मांघर या गावाने पटवून दिलेले आहे. गावाच्या आसपास असलेले घनदाट जंगल, प्रचंड जैवविविधता गावामध्ये मधाच्या निर्मितीला पोषक वातावरण तयार करत असल्याचे दिसून येते. या गावाला भेट देण्याचा सर्वोत्तम वेळ ऑक्टोबर ते मार्च या दरम्यानचा आहे. मोठ्या प्रमाणात मध उत्पादनामुळे महाराष्ट्राचे मध गाव म्हणून ओळखले जाते. पर्यावरणाला अनुकूल मध संकलन करणाऱ्या पारंपारिक मधमाशीपालक समुदायांचे घर हे या ठिकाणचे वैशिष्टये आहे.

प्रमुख आकर्षणे

अ. मधमाशीपालन आणि मध प्रक्रिया – पर्यटक पारंपारिक आणि आधुनिक मधमाशीपालन तंत्रांचा शोध घेऊ शकतात. मध काढणे आणि प्रक्रिया करण्याचा प्रत्यक्ष अनुभव मिळू शकतो. जैवविविधता आणि शेतीमध्ये मधमाशांचे महत्त्व यावर प्रात्यक्षिके दाखविण्यात येतात.

ब. सेंद्रिय शेती आणि ग्रामीण पर्यटन – मांघर गावातील शेतकरी रासायनिक मुक्त शेतीसह शाश्वत शेतीला प्रोत्साहन देते. पर्यटक शेतीच्या कामांमध्ये सहभागी होऊ शकतात आणि ग्रामीण जीवनाचा अनुभव घेऊ शकतात.

क. सह्याद्री वन आणि वन्यजीव – हिरव्यागार जंगलांसह समृद्ध जैवविविधता गावाभोवती उपलब्ध आहे. विविध वनस्पती आणि प्राण्यांचे घर, जे निसर्ग प्रेमींसाठी एक उत्तम ठिकाण बनवते.

ड. स्थानिक संस्कृती आणि हस्तकला – हर्बल मध, मेणाच्या मेणबत्त्या आणि सेंद्रिय सौंदर्यप्रसाधने यासारखी पारंपारिक मध–आधारित उत्पादने विक्रीसाठी उपलब्ध आहेत.

**मांघर काही वैशिष्टये आणि पर्यटन विकासाचा परीणाम**

- मध उत्पादन आणि पर्यटनाद्वारे रोजगाराच्या संधी वाढल्या आहेत.
- मध आणि सेंद्रिय उत्पादने विकणाऱ्या लघु उद्योगांची वाढ झालेली आहे.

- पारंपारिक मधमाशी पालन पद्धती आणि स्वदेशी ज्ञानाचे जतन करणे चालू आहे.
- मधमाश्यांच्या अधिवासासाठी वनक्षेत्रांचे संरक्षण करण्याचे महत्त्वाचे काम करत आहेत.
- वाढत्या पर्यटनाला सामावून घेण्यासाठी चांगल्या पायाभूत सुविधांची आवश्यकता असून त्यावर काम चालू आहे.
- मधमाश्यांच्या लोकसंख्येला हानी पोहोचविल्याशिवाय शाश्वत मध काढणी कशा प्रकारे केली जाऊ शकते याचे प्रशिक्षण दिले जाते.
- पर्यटनामुळे होणारा कचरा आणि पर्यावरणीय परिणाम व्यवस्थापित करण्यासाठी प्रयत्न केले जातात.
- इको–टुरिझमला प्रोत्साहन देण्याचे काम सर्व गावकऱ्यांकडून केले जात आहे.

मांघरने पर्यावरणीय पर्यटन आणि शाश्वत शेती यांचे यशस्वीरित्या मिश्रण केले आहे, ज्यामुळे ते महाराष्ट्रातील एक अद्वितीय ठिकाण बनले आहे. गावातील मध उत्पादन केवळ स्थानिक अर्थव्यवस्थेलाच आधार देत नाही तर पर्यावरण संवर्धनाला देखील प्रोत्साहन देते. योग्य व्यवस्थापन आणि शाश्वत पद्धतींसह, मांघर आपला समृद्ध सांस्कृतिक वारसा जपून पर्यावरणपूरक पर्यटन केंद्र म्हणून भरभराटीला येऊ शकते.




**१२. मधाचे गाव – मांघर (सातारा)**

## प्रकरण पाचवे

# समारोप

### अ) भौगोलिक वैशिष्ट्ये

सातारा जिल्हयातील वाई पाचगणी महाबळेश्वर आणि प्रतापगड ही पर्यटन स्थळे आणि आसपासची ठिकाणे बऱ्याच अंशी सर्व वैशिष्टयांमध्ये समान आहेत. त्यापैकी वाई हे सहयाद्रीच्या कुशीत आहे. त्यामुळे पर्वतमाथ्यापेक्षा याची वैशिष्टये भिन्न आहेत. परंतू या ठिकाणी पाचगणी आणि महाबळेश्वर या दोन्ही पर्यटन स्थळांच्या आसपासच्या ठिकाणांना भेटी दिल्या असल्याने त्या अनुषंघानेच समारोपाचे लेखन करण्यात आले आहे.

१. **स्थान —** पाचगणी — महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यात स्थित, पुण्यापासून अंदाजे ८० किमी आणि मुंबईपासून २५० किमी अंतरावर आहे. महाबळेश्वर — सातारा जिल्ह्यात देखील, पाचगणीपासून सुमारे २० किमी अंतरावर असलेले महाबळेश्वर पाचगणीपेक्षा जास्त उंचीवर आहे.

२. **उंची —** पाचगणी — समुद्रसपाटीपासून १३३४ मीटर (४३७७ फूट) उंचीवर आहे. महाबळेश्वर — समुद्रसपाटीपासून १३५३ मीटर (४४३९ फूट) उंचीवर आहे.

३. **हवामान —** पाचगणी आणि महाबळेश्वर दोन्ही प्रदेशांमध्ये समशीतोष्ण हवामान आहे. उन्हाळा थंड आणि आल्हाददायक असतो, तर हिवाळा थंड असू शकतो, डिसेंबर आणि जानेवारीमध्ये तापमानात लक्षणीय घट होते. पावसाळ्यात मात्र मुसळधार पाऊस पडतो.

४. **टेकड्या आणि दऱ्या —** पाचगणी हे त्याच्या सभोवतालच्या 'सह्याद्री पर्वतरांगांसाठी' आणि त्याच्या सुंदर सपाट टोपलेल्या आकाराच्या टेबल लँडसाठी प्रसिद्ध आहे. तर महाबळेश्वर हे त्याच्या हिरव्यागार टेकड्या आणि दऱ्यांसाठी ओळखले जाते, तसेच आजूबाजूच्या भूदृश्यांचे विहंगम दृश्ये दिसणारी भूदृश्य येथे आहेत.

५. **जलस्रोत —** पाचगणी — कृष्णा नदी पाचगणीजवळून वाहते आणि ती एक महत्त्वपूर्ण जलस्रोत आहे. पावसाळयात पडणारे पाणी साठवून ठेवणारी अनेक

लहान बंधारे येथे आहेत. तर महाबळेश्वर हे कृष्णा, कोयना, वेन्ना, सावित्री आणि गायत्री अशा मिळून पाच नद्यांचे उगमस्थान आहे. त्यापैकी सावित्री आणि गायत्री या कोकणामध्ये वाहतात. तर कृष्णा आणि कोयना या पठारावरील प्रमुख नद्या आहेत. महाबळेश्वर हे 'वेन्ना तलावाचे' असलेले ठिकाण आहे, जे नौकाविहार आणि मनोरंजनासाठी एक लोकप्रिय ठिकाण आहे.

६. **वनस्पती** — दोन्ही प्रदेश वनस्पतींनी समृद्ध आहेत, दाट जंगले आहेत, विशेषत: महाबळेश्वर क्षेत्राभोवती अतिशय घनदाट जंगल असून प्रचंड जैवविविधता आढळते, जिथे या ठिकाणी आपल्याला उष्णकटिबंधीय आणि समशीतोष्ण प्रजातींचे मिश्रण पहावयास मिळते.

**ब) सामाजिक वैशिष्ट्ये**

१. **लोकसंख्या** — पाचगणी आणि महाबळेश्वर या दोन्ही ठिकाणी स्थानिक लोकसंख्या कमी आहे आणि पर्यटकांचा ओघ हंगामी असतो. पाचगणीमध्ये कायमस्वरूपी रहिवासी, बोर्डिंग स्कूलचे विद्यार्थी आणि पर्यटकांचे मिश्रण असले तरी, महाबळेश्वर हे केवळ पर्यटन केंद्र आहे.

२. **सांस्कृतिक विविधता** — दोन्ही ठिकाणी मराठी स्थानिक लोक राहतात, परंतु भारताच्या इतर भागांतील, विशेषत: गुजरात, गोवा आणि महाराष्ट्रातील लोकांमध्ये ते लोकप्रिय झाले आहेत. बरेच पर्यटक पुणे आणि मुंबई येथून येतात. अलीकडील काळात व्यवसायांच्या निमित्ताने भारतातील विविध प्रदेशातील लोक या ठिकाणी राहतात.

३. **भाषा** — पाचगणी आणि महाबळेश्वर येथे मराठी ही प्राथमिक भाषा आहे, परंतु हिंदी आणि इंग्रजी भाषा मोठ्या प्रमाणात समजल्या आणि बोलल्या जातात, विशेषत: पर्यटन उद्योगात या भाषांची गरज आणि स्थलांतरामुळे या दोन्ही भाषाही या ठिकाणी बोलल्या जाऊ लागल्या आहेत.

४. **शैक्षणिक संस्था** — पाचगणी या शहरात अनेक प्रसिद्ध बोर्डिंग स्कूल आहेत, जसे की 'द इंटरनॅशनल स्कूल ऑफ पाचगणी' आणि 'सेंट पीटर स्कूल'. तर

महाबळेश्वर येथे शाळांची संख्या कमी आहे परंतु शैक्षणिक संस्थांपेक्षा ऐतिहासिक इमारती आणि मंदिरांसाठी ते प्रसिद्ध आहे.

### क) आर्थिक वैशिष्ट्ये

१. **पर्यटन** — पाचगणी येथे पर्यटन हा एक प्रमुख आर्थिक व्यवसाय आहे. अनेक शाळा आणि शैक्षणिक संस्था या ठिकाणी आहेत. पर्यटन आणि निवासी शाळा यावर पाचगणीची अर्थव्यवस्था अवलंबून आहे. तर महाबळेश्वरची पर्यटन चालित अर्थव्यवस्था असलेले एक प्रमुख पर्यटन स्थळ, स्थानिक अर्थव्यवस्थेत पर्यटन आणि पूरक व्यवसायांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे.

२. **शेती** — पाचगणी स्ट्रॉबेरी लागवडीसाठी ओळखले जाते, उत्पादन हे त्याच्या स्थानिक अर्थव्यवस्थेचा एक महत्त्वाचा भाग आहे. इतर पिकांमध्ये तुती आणि भाज्यांचा समावेश होतो. महाबळेश्वर हे स्ट्रॉबेरी, तुती, रास्पबेरी आणि कॉर्नसाठी प्रसिद्ध आहे. आजूबाजूची सुपीक जमीन शेती आणि भाजीपाला आणि फलोत्पादनाला आधार देते.

३. **पायाभूत सुविधा** — पाचगणी आणि महाबळेश्वर पर्यटन स्थळे म्हणून लोकप्रिय असल्याने दोन्ही प्रदेशांमध्ये रिअल इस्टेटमध्ये वाढ झाली आहे, या ठिकाणी पर्यटक दुसऱ्या घरासाठी प्राध्यान्य देतात. त्यामुळे सर्व प्रकारच्या पायाभूत सुविधा उपलब्ध आहेत.

४. **स्थानिक व्यवसाय** — दोन्ही प्रदेशांमध्ये, हस्तकला, खाद्यपदार्थ आणि स्मृतिचिन्हे विकणारी स्थानिक दुकाने भरभराटीला आलेली आहेत. याव्यतिरिक्त, हॉटेल्स, रेस्टॉरंट्स आणि टूर ऑपरेटर हे व्यवसाय अर्थव्यवस्थेत योगदान देताना दिसतात.

### ड) सांस्कृतिक वैशिष्ट्ये

१. **उत्सव** — दोन्ही शहरे 'गणेश चतुर्थी', 'दिवाळी', 'मकर संक्रांती' आणि 'होळी' सारखे प्रमुख सण साजरे करतात. महाबळेश्वरमध्ये, मंदिरांशी संबंधित धार्मिक सण महत्त्वाचे मानले जातात.

२. **पाककृती —** पाचगणी आणि महाबळेश्वर येथे वडा पाव', 'पावभाजी', 'मिसळ पाव' आणि विविध स्थानिक मिठाई असे पारंपारिक महाराष्ट्रीयन पदार्थ मिळतात. तसेच जाम आणि सिरप सारख्या स्ट्रॉबेरी—आधारित उत्पादनांसाठी देखील ओळखले जाते. महाबळेश्वरचा चना प्रसिध्द आहे.

**इ) पर्यटन वैशिष्टये**

**पाचगणी —**

१. टेबल लॅंड — येथे असलेल्या दऱ्यांचे निसर्गरम्य दृश्ये देणारा आणि पॅराग्लायडिंग आणि घोडेस्वारीसाठी आदर्श असलेला एक प्रसिद्ध सपाट पठार आहे.
२. सिडनी पॉइंट — आजूबाजूच्या टेकड्या आणि दऱ्यांचे विहंगम दृश्य पाहण्यासाठी प्रसिध्द.
३. मॅप्रो गार्डन — ताज्या स्ट्रॉबेरी, जाम आणि सिरप देणारी एक बाग आणि स्ट्रॉबेरी फार्म. त्यात एक कॅफे देखील आहे येथे स्वादिष्ट स्ट्रॉबेरी—आधारित मिष्टान्न उपलब्ध आहेत.
४. पारसी पॉइंट — कृष्णा व्हॅली आणि पाचगणीभोवतीच्या टेकड्यांचे सुंदर दृश्य येथून दिसते.
५. हॅरिसन फॉली — एक निसर्गरम्य आणि कमी गर्दीचे ठिकाण, ट्रेकिंग आणि एक्सप्लोरेशनसाठी प्रसिध्द.
६. देवराई आर्ट व्हिलेज — एक ठिकाण जिथे पर्यटक स्थानिक कलाकारांनी बनवलेल्या हस्तकला कला, मातीची भांडी आणि शिल्पे खरेदी करू शकतात.
७. भिलार — पुस्तकांचे गाव म्हणून प्रसिध्द.

**महाबळेश्वर —**

१. वेना तलाव — हिरव्यागार टेकड्यांनी वेढलेले बोटिंगसाठी एक लोकप्रिय तलाव.
२. आर्थर सीट — खाली असलेल्या दऱ्यांचे आश्चर्यकारक दृश्यासाठी प्रसिध्द.
३. विल्सन पॉइंट — महाबळेश्वरमधील सर्वात उंच ठिकाण.

४. लिंगमाला धबधबा – महाबळेश्वरपासून सुमारे ६ किमी अंतरावर असलेला एक नयनरम्य धबधबा, ट्रेकिंग आणि फोटोग्राफीसाठी लोकप्रिय आहे.

५. प्रतापगड किल्ला – महाबळेश्वरपासून सुमारे २५ किमी अंतरावर असलेला एक ऐतिहासिक किल्ला, जो मराठा साम्राज्याची झलक दाखवतो आणि उत्कृष्ट ट्रेकिंगच्या संधी प्रदान करतो.

६. महाबळेश्वर मंदिर – भगवान शिवाला समर्पित एक महत्त्वाचे धार्मिक स्थळ, जे यात्रेकरू आणि पर्यटक दोघांनाही आकर्षित करते.

७. स्ट्रॉबेरी फार्म – महाबळेश्वरमधील सुपीक माती भारतातील काही सर्वोत्तम स्ट्रॉबेरीचे उत्पादन करते. अनेक स्ट्रॉबेरी फार्म पर्यटकांना ताजी स्ट्रॉबेरी निवडण्यासाठी सोय निर्माण करून देतात.

पाचगणी आणि महाबळेश्वर हे दोन्ही अद्वितीय भौगोलिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक वैशिष्ट्यांसह उत्तम हिल स्टेशन आहेत. पाचगणी त्याच्या शैक्षणिक संस्था आणि टेबल लॅंडसारख्या निसर्गरम्य स्थळांसाठी ओळखले जाते, तर महाबळेश्वर हे एक अधिक विकसित पर्यटन केंद्र आहे, जे त्याच्या ऐतिहासिक महत्त्व, हिरवाई आणि फळांच्या लागवडीसाठी, विशेषत: स्ट्रॉबेरीसाठी ओळखले जाते. एकत्रितपणे, ते नैसर्गिक सौंदर्य, साहस, विश्रांती आणि सांस्कृतिक अनुभवांचे एक रमणीय अनुभव प्रदान करून देते.



**१३. महाबळेश्वर – पंचगंगा मंदीर (पाच नद्यांचा उगम)**

# सहली दरम्यानचे काही जिओटॅग छायाचित्रे







GPS Map Camera
412806,
20/02/2025 05:52 PM GMT +05:30
Google


GPS Map Camera
Wai, Maharashtra, India
Xv3p+2jc, Ganpati Ali, Wai, Maharashtra 412803, India
Lat 17.952495° Long 73.886501°
20/02/2025 08:57 AM GMT +05:30







# संदर्भ ग्रंथ सूची

१. पर्यटन भूगोल (२०२४) — निराली प्रकाशन — मुळूक, मोरे, बोरसे, पगार

२. पर्यटन भूगोल (२०२१) — निराली प्रकाशन — मुळूक, मोरे, मुसमाडे, डोके

३. पर्यटन भूगोल (२०२२) — निराली प्रकाशन — मुळूक, मोरे, मुसमाडे, डोके

४. पर्यटन भूगोल (२०२२) — डॉ. शैलेश वाघ, डॉ. सिध्दार्थ सोनवणे

५. पर्यटन भूगोल (२०२४) — विश्व भारती प्रकाशन — डॉ. विमलकुमार कपूर

६. पर्यटन भूगोल (२०२४) — शारदा प्रकाशन — डॉ. एस. डी. मौर्य, प्रविण कुमार

७. पर्यटन भूगोल (२०२४) — डायमंड प्रकाशन — डॉ. मुढे, कुदनर, तेलंग

८. पर्यटन भूगोल (२०२४) — डॉ. राजेश शुक्ला, डॉ. रश्मी शुक्ला

# सहलीमध्ये सहभागी झालेल्या विद्यार्थी आणि शिक्षकांची यादी २०२४–२०२५

श्री. ता. शि. प्र. मंडळाचे
हुतात्मा राजगुरु महाविद्यालय, राजगुरुनगर
ता. खेड, जि. पुणे
शैक्षणिक सहल - गुजरात दि. 20/1/25

विद्यार्थी यादी –

| अ.क | विद्यार्थ्यांचे संपूर्ण नाव | रजिस्टर नंबर | वय | स्त्री / पुरुष |
|---|---|---|---|---|
| १. | बांबळे कांचन एकनाथ | ११८२३०२०८३ | २० | F |
| २. | बारणे पूजा संजय | ११८२३०१८६६ | २० | F |
| ३. | भारमळ संचेती ज्ञानेश्वर | ११८२३०२१८५ | २० | F |
| ४. | भोगाडे साक्षी सुभाष | ११८२३०२००५ | २० | F |
| ५. | भोंगले वेदांती प्रकाश | ११८२३१४५०९ | २० | F |
| ६. | बोबडे अजय महादू | ११८२३०१८४० | २० | M |
| ७. | गवारी अपेक्षा विजय | ११८२३०१९३४ | २० | F |
| ८. | घुसळकर अंजली राजेंद्र | ११८२३०१९४३ | २० | F |
| ९. | गुळाणकर सिद्धेश अनिल | ११८२३०५०५८ | २० | M |
| १०. | गुळाणकर वैष्णवी अनिल | ११८२३०१८८२ | २० | F |
| ११. | इनामदार सना गनी | ११८२३०१९८९ | २० | F |
| १२. | जांगीड सिद्धी पुखराज | ११८२३०१८६३ | २० | F |
| १३. | केदारी स्वामी दत्तात्रय | ११८२३०१९०२ | २० | M |
| १४. | खेडकर साक्षी गोरक्षनाथ | ११८२३०२६४७ | २० | F |
| १५. | खोपे चिन्मय योगेश | ११८२३०२०१५ | २० | M |
| १६. | मडके अभिषेक अजित | ११८२३०२००० | २० | M |
| १७. | मुके साक्षी विजय | ११८२३०१९९४ | २० | F |
| १८. | पारधी अविनाश काळूराम | ११८२३०१९०० | २० | M |
| १९. | पठाण सोहेल गौसखान | ११८२३०२०२१ | २० | M |
| २०. | पवार चैतन्य घनश्याम | ११८२३०२००१ | २० | M |
| २१. | पवार मानसी सुरेश | ११८२३०१८८५ | २० | F |
| २२. | पवार तेजल खंडू | ११८२३०१९८८ | २० | F |
| २३. | पिंगळे दिव्या तानाजी | ११८२३०१८३७ | २० | F |
| २४. | सावंत अनुजा संभाजी | ११८२३०२१७५ | २० | F |
| २५. | सावंत सुहानी संतोष | ११८२३०१८३९ | २० | F |
| २६. | शेलार सिद्धी गणेश | ११८२३०२०५५ | २० | F |
| २७. | शिंगारे संतृप्ती शंकर | ११८२३०२६१५ | २० | F |
| २८. | तांबे शिवानी नामदेव | ११८२३०१८६८ | २० | F |
| २९. | उतळे तुषार वसंत | ११८२३०२०१० | २० | M |
| ३०. | काशीद समीर खंडू | ११८२३०१९५५ | २० | M |
| ३१. | डाके पूजा विजय | ११८२२०९०९६ | २१ | F |
| ३२. | ढगे आरती दत्तात्रय | ११८२२०९०६१ | २१ | F |
| ३३. | गाडे आदिती संतोष | ११८२२०९०६० | २१ | F |
| ३४. | इनामदार आलिशा हसन | ११८२२०९०८४ | २१ | F |
| ३५. | कोंगले साक्षी भिकाजी | ११८२२०९२७३ | २१ | F |
| ३६. | मुसळे अनिशा अनिल | ११८२२०९०६२ | २१ | F |
| ३७. | पाटोळे श्रावणी रामभाऊ | ११८२२०९०८३ | २१ | F |
| ३८. | थिटे अंजली संतोष | ११८२२०९१०१ | २१ | F |
| ३९. | डॉ.दादासाहेब मच्छिंद्र मारकड | शिक्षक | ४७ | M |
| ४०. | प्रा.मच्छिंद्र लक्ष्मण मुळूक | शिक्षक | ४८ | M |
| ४१. | प्रा. रौनक भिसे | शिक्षिका | २३ | F |

HUTATMA RAJGURU MAHAVIDYALAYA
RAJGURU NAGAR

PRINCIPAL
Hutatma Rajguru Mahavidyalaya
Rajgurunagar, Tal.Khed, Dist.Pune.

आगार व्यवस्थापक (क)
रा. प. राजगुरुनगर आगार